आधुनिक
# केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २ फेब्रुवारी २०२४






## अर्थसंकल्पात २०४७ मधील विकसित भारताची हमी

आजचा अर्थसंकल्प हा अंतरिम अर्थसंकल्प असला तरी तो सर्वसमावेशक आणि कल्पक असा अर्थसंकल्प आहे . या अर्थसंकल्पात सातत्याचा विश्वास असून हा अर्थसंकल्प युवक, गरीब, महिला आणि शेतकरी या विकसित भारताच्या चार स्तभांचे सबलीकरण करेल . अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प २०४७ मधील विकसित भारताचा पाया रचण्याची हमी देतो . एक चांगला अर्थसंकल्प मांडल्याबद्दल सीतारमण आणि त्यांच्या सहकाऱ्यांना शुभेच्छा देतो . या अर्थसंकल्पात प्राप्तीकर सूट योजनेची घोषणा करण्यात आली आहे . या योजनेमुळे मध्यमवर्गातील एक कोटी लोकांना दिलासा मिळणार आहे . आमच्या आधीच्या सरकारने अनेक दशकांपासून सामान्य माणसाच्या डोक्यावर ही एक मोठी टांगती तलवार ठेवली होती . ती आम्ही बाजूला केली, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली .

# दिलखुश अर्थसंकल्प!

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा सलग सहावा अर्थसंकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : कोणत्याही घटकाला न दुखावता आणि कररचनेत कोणताही बदल न करता केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सर्वांना खुश करणारा 'दिलखुश अंतरिम अर्थसंकल्प' आज सादर केला. 'विकसित भारत बजेट' या नावाने सादर केलेला हा अर्थसंकल्प त्यांचा सलग सहावा अर्थसंकल्प आहे.**


**अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अंतरीम अर्थसंकल्पात संरक्षण खर्चात वाढ केली आहे. सरकारचे संपूर्ण लक्ष देशाच्या संरक्षण क्षेत्रावर असल्याचे दर्शवण्याचा प्रयत्न सरकारने आजच्या अंतरीम अर्थसंकल्पातून केला आहे. निर्मला सीतारामन यांनी संरक्षण अर्थसंकल्पाबाबत मोठी घोषणा केली आहे. अंतरीम अर्थसंकल्पात संरक्षण खर्च मागील अर्थसंकल्पातील 5.94 लाख कोटींवरून 6.25 लाख कोटी रुपये करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष 2024 च्या अर्थसंकल्पात संरक्षण खात्यासाठी सर्वाधिक 5.94 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जी सरकारच्या एकूण बजेट खर्चाच्या 13.2 टक्के इतकी होती. आर्थिक वर्ष 2023 मध्ये, सरकारने 5.25 लाख कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यानंतर सुधारित तरतूद 5.85 लाख कोटी रुपये इतकी करण्यात आली. आर्थिक वर्ष 2024 मध्ये, सरकारने 5.94 लाख कोटी रुपयांचे बजेट मांडले, जे आधीच्या आर्थिक वर्षामधील सुधारित खर्चापेक्षा 1.5 टक्के जास्त आहे. आता संरक्षणावरील खर्च हे जीडीपीच्या 3.4 टक्के इतके असेल.**

**रोटी, कपडा, मकान देणारा हा अर्थसंकल्प :**



गेल्या ६० वर्षांत जे निर्णय झाले नाहीत, ते गेल्या १० वर्षांत झाले . गरीब, शेतकरी, महिला व तरुण या चार प्रमुख घटकांना त्यांनी न्याय दिला . महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम कसं करावं, हे त्यांनी दाखवून दिलं . आजच्या अर्थसंकल्पात महिला व मुलींना प्राधान्य दिलं आहे . पंतप्रधान आवास योजनेत २ कोटी घरं वाढवण्याचा निर्णय घेतला आहे . त्यामुळे एक प्रकारे रोटी, कपडा, मकान देणारा हा अर्थसंकल्प व हे केंद्र सरकार आहे . **एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**तुमच्या मित्रांच्या पलिकडेसुद्धा देश आहे :**




सरकारने आज शेवटचा अर्थसंकल्प सादर केला . सीतारमण यांनी जड अंत :करणाने हे कार्य पार पाडलं . मी त्यांचं अभिनंदन करतो आहे . अर्थमंत्री म्हणाल्या, देशात आम्ही गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी या चार जातींसाठी काम करणार आहोत . निवडणुका आलेल्या आहेत, तरीही त्यांनी पंतप्रधानांना सांगितलं की देशात फक्त तुमचे सुटाबुटातले मित्र नाहीत . तुमच्या मित्रांच्या पलिकडेसुद्धा देश आहे . ज्यात तरुण, महिला, शेतकरी आणि गरीब जनता आहे . **उद्धव ठाकरे**

**विकसित भारताचा संकल्प सांगणारा अर्थसंकल्प :**



या अर्थसंकल्पात विशेषत : महिला, शेतकरी, गरिब, युवा आणि मध्यमवर्गीय अशा सर्वच घटकांकडे विशेष लक्ष देण्याचा प्रयत्न झाला आहे . एक कोटी कुटुंबांना सोलर यंत्रणा देऊन ३०० युनिटपर्यंत वीज मोफत देण्याचा संकल्प यात आहे . गरीब, चाळीत, झोपडपट्टीत राहणारे, मध्यमवर्गीय यांना स्वत :चे घर घेण्यासाठी योजना तयार करण्यात येणार आहे . १ लाख कोटींचा व्याजमुक्त निधी तयार करुन युवांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय तर अतिशय क्रांतीकारी आहे . **देवेंद्र फडणवीस**

**सरकार केवळ ज्ञान पाजळतंय :** हे सरकार केवळ



ज्ञान पाजळतंय, परंतु, त्यांची तरुणांशी, गरिबांशी, महिला आणि शेतकऱ्यांशी बांधिलकी दिसत नाही . अर्थमंत्री बढाई मारण्यात, थापा मारण्यात, भाषणबाजी करण्यात आणि खोटं बोलण्यात गुंतल्या आहेत . अर्थव्यवस्थ उत्तम असेल तर गेल्या नऊ वर्षांमध्ये तब्बल १२,८८,२९३ उद्योजकांनी भारत का सोडला ? ७,२५,००० भारतीयांनी बेकायदेशीरपणे अमेरिकेत प्रवेश करण्याचा प्रयत्न का केला ? यापैकी बहुसंख लोक हे ‘ व्हायब्रंट गुजरात ’शी संबंधित होते . **प्रकाश आंबेडकर**

**सीतारमण यांना डोकं वापरण्याची मुभा नाही :**



आज सादर झालेला अर्थसंकल्प हा अंतरिम अर्थसंकल्प आहे . या अर्थसंकल्पात निर्मला सीतारमण यांनी आपली अर्थव्यवस्था खूप चांगल्या प्रकारे काम करते आहे . त्याचप्रमाणे आम्ही आमच्या सगळ्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणली आहे . तसंच महागाई आहे पण ती माफक आहे असं निर्मला सीतारमण यांनी म्हटलं आहे . तसंच आपल्या देशातल्या पायाभूत सुविधांवर त्यांनी भाष्य केलं आहे . अर्थव्यवस्था गतिमान करण्याच्या दृष्टीने आम्ही पुढे चाललो आहोत असंही निर्मला सीतारमण यांनी म्हटलं आहे . **यशोमती ठाकूर**

**पुरवणी अर्थसंकल्पात बियाणे उद्योगांसाठी निश्चितच फलदायी निर्णय :** 'जय जवान जय किसान जय विज्ञान' सोबत



'जय अनुसंधान' असा नवा नारा पंतप्रधानांनी दिला आहे . संशोधनाला महत्त्व मिळेल . सरकारने शेतकऱ्यांना सक्षम करण्यावर भर दिला आहे . पंतप्रधान किसान सन्मान निधीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात ट्रान्सफर केली जात आहे . आतापर्यंत पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेतून ११ .८ कोटी शेतकऱ्यांना मदत केल्याचे दिसून येते आहे . देशातील ४ कोटी शेतकऱ्यांना पंतप्रधान पीकवीमा योजनेचा लाभ देण्यात आला आहे . तसेच शेतीसाठी आधुनिक साठवण केली जाणार असून पुरवठा साखळीवर भर देण्यात येईल . याशिवाय, सरकार मोहरी आणि भुईमूग लागवडीला आणखी प्रोत्साहन देणार आहे . दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकार योजना आणणार आहे . कृषी स्टार्टअप्सच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळवून देण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे . ८० कोटी लोकांच्या मोफत रेशनद्वारे अन्नाची चिंता दूर झाली . अन्नदात्याची उत्पादनासाठी एमएसपी वेळोवेळी वाढवली जात आहे . मुलभूत गरजांच्या तरतुदीमुळे ग्रामीण भागात खरे उत्पन्न वाढले आहे . बियाणे, कृषी विषयक आणि इतर उद्योगासाठी प्रोत्साहन व योग्य त्या वातावरणाची गरज असून सातत्याने निसर्गाच्या लहरींमुळे तसेच पूर्णपणे हवामानावर अवलंबून असणाऱ्या बियाणे उद्योगाला या अर्थसंकल्पाकडून खूप काही अपेक्षा होत्या . पण यावर्षी पण काही सवलती किंवा सहाय्य जाहीर झाले नाही पण आम्ही सकारात्मक आहोत . येणाऱ्या पुरवणी अर्थसंकल्पात आमच्या बियाणे उद्योगांसाठी निश्चितचं काही फलदायी निर्णय, सहाय्य किंवा प्रोत्साहन मिळेल, अशी आशा बाळगतो . **समीर मुळे**

**मराठा समाजाला लगेच आरक्षण द्या . :** मला



अर्थसंकल्पातलं काही कळत नाही . काही लोक बजेट कोलमडलंय किंवा बजेटमधून काही मिळालं नाही असं म्हणतायत त्यांना किंवा अर्थतज्ज्ञांकडे तुम्ही प्रतिक्रिया मागितली पाहिजे . कारण मला त्यातलं काही कळत नाही . अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मराठा समाजाला आरक्षण देता येत असेल तर लगेच द्या . आमची लढाई आरक्षणासाठी आहे, आरक्षण मिळाले की, आमचे बजेट आपोआप सुधारेल . **मनोज जरांगे पाटील**

## कोणाला काय फायदा झाला

**3 कोटी महिला होणार लखपती दीदी :** देशात सध्या एक कोटी महिला लखपती झाल्याचे त्यांनी सांगितले . भाजप शासित राज्यांमध्ये ही योजना लोकप्रिय ठरली आहे . आता या योजनेतंर्गत देशात 3 कोटी महिलांना लखपती दीदी योजनेचा लाभ देण्यात येणार आहे .

**दोन कोटी घरे बांधणार :** पंतप्रधान आवास योजननेअंतर्गत येत्या पाच वर्षात ग्रामीण भागात दोन कोटी घरे बांधण्यात येणार असल्याची घोषणा निर्मला सीतारामन यांनी केली . 300 यूनिट वीज मोफत देण्याची महत्त्वाची घोषणाही निर्मला सीतारामन यांनी केली आहे .

**आशा सेविका, अंगणवाडी सेविकांना गिफ्ट :** आशा वर्कर, अंगणवाडी सेविकांना आयुष्यमान भारत योजनेचा लाभ देण्यात येणार आहे . या योजनेत पाच लाख रुपयांपर्यंतच्या उपचाराची सोय होणार आहे . त्याचा फायदा देशातील अंगणवाडी आणि आशा सेविकांना मिळेल .

**रेल्वे कोचबाबत महत्वाची अपडेट :** भारतीय रेल्वेचे 40 हजार नॉर्मल रेल्वे कोच वंदे भारत ट्रेनमध्ये बदलण्यात येणार आहे . वंदे भारत ट्रेन सध्या लोकप्रिय आहे आणि तिला जोरदार प्रतिसाद मिळत आहे . तर पीएम गती शक्ती उपक्रमातंर्गत या कॉरिडॉरची बांधणी करण्यात येणार आहे . हाय ट्रॅफिक कॉरिडॉरमुळे प्रवासी ट्रेन्सच संचालन अधिक गतीने आणि सुरक्षितपणे होईल . सेमी हाय–स्पीड ट्रेन्सची संख्या आणखी वाढवली जाईल . देशातील शहरांमध्ये मेट्रोचे जाळे उभारण्यावर भर देण्यात येत आहे .

**विमानतळाची संख्या होणार दुप्पट :** विमान वाहतूक क्षेत्राचा कायापालट होईल . दहा वर्षांत विमानतळांची संख्या दुप्पट होईल . नवीन 149 विमानतळ उभारण्यात येणार आहे . टिअर 2, टिअर 3 शहरांमध्ये उड्डाण योजना राबविण्यावर भर, 517 नवीन मार्ग आणि 1 .3 कोटी प्रवाशी असल्याची आकडेवारी समोर आली आहे .


**शेतकऱ्यांसाठी मदत :** अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रावर पण भर देण्यात आला आहे . दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी सर्वसामावेशक कार्यक्रम आखला जाणार आहे . पीएम किसान योजनेतून 11 .8 कोटी शेतकऱ्यांना सरकारी मदत देण्यात आली आहे . तर 4 कोटी शेतकऱ्यांना पीकविम्याचे कवच देण्यात आले आहे .

**टॅक्स स्लॅबमध्ये नाही बदल :** या अंतरिम अर्थसंकल्पात अपेक्षेप्रमाणे कर रचनेसंदर्भात कोणताच बदल झालेला नाही . नव्या कर रचनेनुसार सात लाखांपर्यंतचे उत्पन्न असणाऱ्या करदात्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही . करपात्र उत्पन्नात तीन टक्क्यांची वाढ झाली आहे . रिटर्न फाईल करणाऱ्या करदात्यांची संख्या 2 .4 टक्क्यांनी वाढली आहे .

**कृषी क्षेत्राशी संबंधित या योजना :** देशातील 1361 बाजार समित्या eName शी जोडण्यात येणार आहे . येत्या पाच वर्षात त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे .

**मिशन इंद्रधनुष्य :** मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत टीकाकारणावर भर देण्यात येणार आहे . नवीन मेडिकल कॉलेज उघडण्यात येणार आहे . गर्भाशयाचा कॅंसर रोखण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे .

**या पण घोषणा :** आदिवासी समाजाच्या विकासावर भर देण्यात येईल . पायाभूत सुविधांवर भर देण्यात येईल . गरिबी हटाव मोहिमेवर भर देणार आहे . प्रत्येक घरी पाणी योजनेवर भर देण्यात येणार आहे . 78 लाख फेरीवाल्यांना मदत करण्यात आली आहे . 54 लाख तरुणांना प्रशिक्षित करण्यात आले आहे .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

देवीने वनात निवास केला म्हणून तिला बनशंकरी असेही म्हटले जाऊ लागले. याच देवीला रक्तदंती, भ्रामरी अशी विविध नावे आहेत. त्या प्रत्येक नावामागे एक विशिष्ट अशी कथा आहे. बदामी व्यतिरिक्त शाकंभरी देवीची देशभरात अनेक ठिकाणी मंदिरे आहेत. त्यातील हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या शिवालिक पर्वत श्रेणीमध्ये वेगवेगळ्या रूपांनी ही आदिशक्ती वास करते आहे. महाराष्ट्रात सोलापूर, बेळगाव, नागेवाडी ( सातारा ), बनाळी ( सांगली जिल्हा, जत तालुका ), कुरुंदवाड ( ता. शिरोळ, जि . कोल्हापूर ), बुधगाव ( सांगली ), विटा ( ता. खानापूर जि सांगली ), कुंभोज ( ता. हातकणंगले जि कोल्हापूर ), पुणे परिसरात वडगाव शेरी, पिंपळे निलख तसेच बारामती, आष्टा, इचलकरंजी इ. ठिकाणी आहेत. त्याचप्रमाणे विजयवाडा, आंध्र प्रदेश येथे कनकदुर्गा या नावाने शाकंभरी मातेचे मंदिर आहे. बंगळुरू, धारवाड, बेळगाव, चेन्नई, वारंगळ, सकराय आणि सांभर ( राजस्थान ) आदी ठिकाणी पण देवीची मंदिरे आहेत. मूर्ती आणि मंदिरांच्या रूपाने स्थूल रूपाने ही देवी विविध ठिकाणी वास्तव्य करीत असली तरी ती सर्वव्यापी आहे. शाकंभरी देवी शीघ्र फलदायिनी, वरदायिनी आहे. मनोभावे भक्ती करणाऱ्यांचे मनोरथ देवी पूर्ण करते. चारही वर्णातील लोकांची ही कुलदेवता आहे. ज्यांची कुलदेवता शाकंभरी आहे, त्यांनी दररोज तिची उपासना अवश्य करावी. ज्यांना तेही शक्य होत नाही त्यांनी या पौषमासातील शुद्ध अष्टमी ते पौर्णिमा अशी तरी तिची विशेषोपासना करावी.



## आनंदी पहाट

### आनंदाच्या गोडीचा कधीही वीट येत नाही

आधुनिक केसरी

आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते. अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### अद्वैती गोविंद | अन्य नाही ||

रात्रंदिन आम्हा | विठ्ठलाचा ध्यास ||
संत सहवास | निरंतर ||१||
ध्यानी मनी स्वप्नी | वैष्णवांचा वास ||
सत्कर्माची कास | धरू आम्ही ||२||
विठोबाची आन | वाहिली तुकाने ||
जपला जीवाने | राम कृष्ण ||३||
अभंगाशी नाते | साधले ओवीने ||
जाणले जीवाने | मर्म एक ||४||
घ्यावा सावकाश | येथे ब्रह्मानंद ||
विठ्ठल गोविंद | अन्य नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

असो ऐसें वृद्धपण ।सकळांस आहे दारुण ।
म्हणोनियां शरण ।भगवंतास जावें ॥५३॥
पुढें वृद्धीस तत्वतां ।गर्भी प्रस्तावा होता ।
तोचि आला मागुता ।अंतकाळीं ॥५४॥
म्हणौनि मागुतें जन्मांतर ।प्राप्त मातेचें उदर ।
संसार हा अति दुस्तर ।तोचि ठाकून आला ॥५५॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

एक देशी अणु आतमा,
नख शिख तेज प्रकाश ।
सारा देह संघात में, ज्यों गृह दीप
प्रकाश ।।१४।।(स्वर्वेद पंचम मण्डल
दशम अध्याय) ०५/१०/१४
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
एकदेशी अणू आत्मा सर्व देहात
नखशिखांत (शरीरभर) प्रकाश
करतो ; ज्याप्रमाणे दिवा घरात एका
ठिकाणी राहून सर्व घर प्रकाशित
करतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी

समासाच्या शेवटाकडे आपण आलो आहोत. या समासात काय शिकायला मिळाले याचं अवलोकन केलं तर लक्षात येईल की, माणसांचा जन्म परत येणार नाही. तेव्हा जन्माला आलो आहोतर सद्गगुणांचा वापर करा. सतत संत वचनावर विश्वास ठेवा. यासाठी समर्थ काही उदाहरणे आपल्याला देतात. जसे लाकुड जळताना अग्निला लाकडाचा आकार प्राप्त होतं. पण अग्नी लाकुड कधीच होत नाही. त्याच प्रमाणे साधुसंतांचे ब्रम्हज्ञान त्यांच्या देहात रहाते. पण तेचं ज्ञान केव्हाही देहरूप होत नाही. कारण त्यांना कशाचाही गर्व नसतो. कापूर जळताना दिसतो,पण परत कापसाची वडी आहे तशीच त्याप्रमाणे दाखवता येणे केवळ अशक्य होय. आत्मज्ञानी जेव्हा दुसऱ्या ज्ञानी पुरूषांच्या देहाला  वंदन करतो, पण तो या जगात नसेल तेव्हा ते परमात्मस्वरूपाशी एकरूप झाल्याने जन्ममृत्युचे फेरे त्यांना नाहीत. मातीत बी पेरले तर काही दिवसांनी त्याला कोंब फुटते पण तेच बी जर अग्नीवर भाजले तर त्याला कोंब फुटणार नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नित्यनेम करणे म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

नित्यनेम करणे म्हणजे सर्वकाळ नित्यात राहणे. आपण मुळात स्वतःच नित्य असून अनित्यात राहिलो आहोत. नित्य जो परमात्मा त्याला विसरून, विषय जे अनित्य त्यात पडल्यामुळे आपल्याला त्याची आठवण होत नाही. त्याची ज्यामुळे आठवण होईल असे जे करणे त्याला नित्यनेम म्हणतात. आपण नेहमीच नित्यनेमात असावे, पण तसे होत नाही; म्हणून दिवसातून थोडा वेळ तरी त्याची आठवण होण्याकरिता काही वाचन आणि वाचलेल्याचे मनन करावे, म्हणजे त्याची सवय होते. जो अखंड नामस्मरण करतो तो नेहमीच नित्यनेमात असतो. नित्यनेम खरा कोणी केला असेल तर तो ब्रह्मानंदबुवांनीच. आपल्याला सदा नामात कसे राहता येईल याचा आपण विचार करावा. याकरिता गुरुआज्ञा प्रमाण मानणे हेच खरे साधन आहे. गुरू सांगेल तोच नित्यनेम होय. त्याला शरण जावे. रोज थोडेसे वाचन, त्यानंतर मनन, मननानंतर त्याप्रमाणे आचरण, आणि शेवटी गुरूस अनन्यशरण, हाच साधकाचा साधनक्रम आहे आणि हाच



त्याचा नित्यनेम होय. आपले आयुष्य जसजसे वाढत जाईल तसतशी साधकाची भगवंताला भेटण्याची उत्सुकता वाढत गेली पाहिजे. केवळ नेम आहे म्हणून उगीच करू नये; साधकाने कोणतीही गोष्ट मनापासून करायला शिकावे. साशंक वृत्तीने परमार्थात बिघडते हे ध्यानात ठेवावे. श्रद्धा हे परमार्थाचे मुख्य भांडवल होय. समाधान हेच सर्वस्व आहे अशी श्रद्धा ठेवावी. ज्याप्रमाणे थर्मामीटरने आपला ताप आपल्याला पाहता येतो, त्याप्रमाणे साधन करताना आपले आपल्याला समाधान किती झाले हे पाहिले पाहिजे. साधकाने जगातले दोष पाहू नयेत, कारण त्या दोषांचे बीज आपल्यामध्येच असते. लोकेषणा, मान फार घातक आहेत. मोठमोठे साधकसुद्धा त्यांच्यापायी अधोगतीला जातात. तसेच पैसा आणि कामवासना यांच्या मर्यादा ओलांडल्यामुळे मोठे साधनी लोकसुद्धा भगवंताच्या जवळ येऊन घसरतात. जगातले हे सर्व पाश आपल्याला बंधनात पाडतात. भगवंताचा पाश हाच खरा पाश. तोच आपल्याला सर्व बंधनांपासून मुक्त करून शाश्वत समाधानाचा लाभ मिळवून देतो. जगाच्या मान-अपमानाला कधी भुलू नये. पैसा आणि कामवासना यांच्यापेक्षाही मान हा देहबुद्धीला जास्त चिकटून आहे. तिथे अगदी सावध असावे. जिथे आपल्याला मान मिळण्याचा संभव आहे तिथे जायचे टाळावे. टाळणे शक्य नसले तर 'हे भगवंताचे देणे आहे' असे मनापासून समजावे. जो खरा मोठा असतो तो कधी मानाची इच्छा धरीत नाही, आणि मान त्याच्याकडे आला तर त्याची क्षिती बाळगत नाही. आपल्याला मान आवडतो का ते पाहावे, म्हणजे त्यावरून आपल्या अंगी खरे मोठेपण किती आहे हे आपल्याला कळेल. जाता-येता देवाला नमस्कार करावा, 'राम, राम' म्हणावे. भगवंताचे प्रेम एकदा लागले की ते पुनः सुटणार नाही.

## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

कालांतराने, सर्व सुखाचे जे निजसुखाचे सारगे माय
तो हा पंढरीराय विटेवरी असा समाधानाचा, शांतीचा भाव मनी उपजला. विठ्ठलाचे चरण हे आत्मसुखासमान असल्याने सर्व इच्छा, वासना निमाल्या. इकडे नगरप्रमुखावर खवळलेल्या लोकांनी त्याच्या घराला आग लावली. पण तो निसटून बादशहाकडे गेला. बादशहाच्या साहाय्याने त्याने लोकांवर सूड उगवला. त्यांच्या घरादारांवर नांगर फिरवला. त्यांना पकडून तुरुंगात टाकून हाल केले आणि सर्वत्र वचक बसवला. नंतर त्याने कान्होपात्रेचा पत्ता मिळवला आणि तिच्या लावण्याचं वर्णन करून तिला जनानखान्यात दाखल करण्याविषयी बादशहाला उद्युक्त केलं. बादशहाने पंढरपूरच्या पुजाऱ्यावर फर्मान बजावलं की त्याने कान्होपात्रेला स्वाधीन करावं. नाहीतर मंदिर जमीनदोस्त करण्यात येईल. विठ्ठलमंदिराला सैनिकांचा गराडा पडला.

शुक्रवार, २ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १६६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 2 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-166 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


# छत्रपती संभाजीनगरमध्ये गॅस टँकर उलटला

## जालना रोडवरील दुर्घटना : उग्र वासासह मोठी वायूगळती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील जालना रोडवर गुरुवारी पहाटेच्या सुमारास गॅस टँकरचा भीषण अपघात झाला. यामुळे टँकरमधून मोठी गॅसगळती सुरू झाली. काही क्षणातच परिसरात उग्र वास पसरला. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली. अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे १० बंब घटनास्थळी दाखल झाले. वायुगळती होत असलेल्या टँकरवर पाण्याचा मारा करण्यात आला. त्याचबरोबर कुठलीही घटना घडू नये, म्हणून परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. तसेच जालना रोडवरील सिडको चौक ते हायकोर्ट सिग्नलपर्यंत वाहतूक पूर्णत: बंद ठेवण्यात आली होती.

नागरिकांनी आपल्या घरातील घरगुती गॅस लाईट शेगडी हे बंद ठेवावे, या अपघात स्थळाच्या आजूबाजूच्या परिसरात रहिवासी वस्ती, शाळा, कॉलेज, हॉटेल, दुकाने असल्याने मोठ्या प्रमाणात लोक राहतात. तसेच लोक जमा होत आहेत. सदर घटनेचे गांर्भीय लक्षात घेता सिडको एन-3,एन-4,एन-5 परिसरातील सर्व शाळा व आस्थपना बंद ठेवण्याचे आदेश निवासी उप जिल्हादंडधिकारी जर्नाधन विधाते यांनी निर्गमित केले होते. अग्निशमन दलाचे जवानांनी गॅस गळती रोखण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करून गॅस गळतीवर दुपारनंतर नियंत्रण मिळविले. छत्रपती संभाजीनगर शहरातून जालना रोड गेला असल्याने शहरातील सिडको परिसरात नेहमी मोठी वर्दळ असते. गुरुवारी पहाटेच्या सुमारास हॉटेल रामगिरीसमोर एचपी गॅस कंपनीचा गॅस वाहून नेणारा टँकर अनियंत्रित होऊन उलटला. क्षणार्धात टँकरमधून मोठी वायूगळती सुरू झाली. परिसरात उग्र वास पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.





# भोकरला सगेसोयरे अधिसूचनेवर हजारो हरकती दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मराठा जातीच्या दबाबात येऊन प्रजासत्ताक दिनी सरकारने अधिसूचना काढून सन २०००व२०१२ च्या अधिसुचनेत बदल करुन मराठा जातिला ओबिसी प्रवर्गात छूप्या मार्गाने वैधता प्रमाणपत्रात देण्याची अधिसूचना काढली आहे.गूरूवारी ता. (एक) येथील ओबीसी समन्वय समितीने त्या विरोधात हजारो हरकती दाखल केले आहेत. तहसील कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सरकार च्या भूमिकेमुळे महाराष्ट्रातील अधिच आरक्षणा बाहेर आसलेले बलुतेदार, भटक्या जाती परत एकदा आरक्षणा पासून कोसो दुर जानार आहेत. शासनाचा कुटिल डाव हाणून पाडण्यासाठी शासन आदेश ची होळी करण्यात आली .यावेळी नामदेव आयलवाड, गोविंद बाबा गौड, नागनाथ घिसेवाड, विठ्ठल फुलारी, माधव अमृतवाड, सुरेश बिल्लेवाड, सतीश देशमुख, डॉक्टर राम नाईक, श्याम रेड्डी , सुभाष नाईक, साहेबराव बोंबे, आनंद आनंतवाड, संदीप गौड पाटील, माधव मेकेवाड, विशाल दंडवे, शेखर कुंटे, नागन पाटील गौड, विठ्ठल माचनवार ,शेंडगे बापू,आदिनाथ चिंताकुटे यांची उपस्थिती होती.

# उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या धुळ्यात 50 बोअरवेलचं करणार डिजिटल उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा उपमुख्यमंत्री ना.अजीत पवार यांचे कट्टर समर्थक इर्शादभाई जहागिरदार यांच्या आग्रहावरुन शनिवार दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ६:३० वाजता अजीत पवार धुळ्यात येत आहेत. त्यांच्याहस्ते 50 बोअरवेलचे डिजिटल उद्घाटन होणार आहे. तसेच शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांच्या राष्ट्रवादीच्या झाशी राणी चौकातील कार्यालयाला देखील ना.अजीत पवार हे सदिच्छा भेट देणार आहेत. त्यानिमित्ताने अजीतदादांचे भव्य असे स्वागत केले जाईल अशी माहिती राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्हाध्यक्ष चौधरी म्हणाले की, अजीतदादांचा जळगाव, नंदुरबारचा नियोजीत दौरा असून इर्शादभाईंच्या आग्रह आणि विनंतीवरुन ना. पवार हे सकाळी धुळ्यात येतील. सकाळी ६: ३० वाजात गोंदूर विमानतळावर अजीतदादांचे आगमन होईल. गोंदूर विमानतळ मार्गे, दत्त मंदिर- नेहरु चौक- पंचवटी - पांझरेवरील छोटा पुल- महाराणा प्रताप चौक- झाशी राणी पुतळा आणि राष्ट्रवादी पक्षाचे कार्यालय येथे आगमन व या कार्यालयाला ना.पवार हे सदिच्छा भेट देणार आहेत. त्यामुळे पक्ष पदाधिकारी आाणि कार्यकर्ते यांच्यात मोठा उत्साह संचारला आहे. विमानतळापासून ते कार्यालयापर्यंत वाजत गाजत ना.दादांचे स्वागत केले जाईल. 6 जेसीबींद्वारे फुलांचा वर्षाव त्यांच्यावर करण्यात येईल. तसेच क्रेनद्वारे भव्य मोठा फुलहार देवून फटाक्यांच्या आतीषबाजीत त्यांचे स्वागत होईल. ना.अजीत पवार यांच्या वाढदिवसानिमित्ताने सामाँजीक बांधलकी जपत इर्शाद जहागिरदार यांनी स्वखर्चाने 250 बोअर करण्याचा संकल्प केला आहे. त्यांपैकी 172 बोअर करण्यात आले आहे. ना.अजीतदादांच्या धुळे दौर्‍याच्या पार्श्वभुमीवर पंन्नास बोअरचे ना.अजीतदादांच्या हस्ते डिजिटल उद्घाटन करण्यात येईल आणि आठवडा भरात या बोअरर्स पूर्णही करण्यात येतील. उर्वरीत बोअर लोकसभा निवडणुकीनंतर करण्यात येणार आहेत, अशी माहितीही कैलास चौधरींनी दिली. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष रवींद्र आघाव, युवा आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष सारांश भावसार, शहर युवाध्यक्ष कुणाल पवार, सामाजीक न्याय विभागाचे प्रदेश सरचिटणीस महेंद्र शिरसाठ, कार्याध्यक्ष शशी खैरनार, नरेंद्र चौधरी आदी उपस्थित होते.

# महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या आंतरपरिमंडलीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन संचालक (संचालन) संजय ताकसांडे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून झाले. राज्यातील 16 परिमंडलांच्या एकूण 8 संयुक्त संघांचे सुमारे बाराशे खेळाडू या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले आहेत.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडांगणावर गुरुवारी (दि.1) सकाळी साडेनऊ वाजता या स्पर्धेला थाटात सुरुवात झाली. यावेळी सर्व खेळाडूंनी संचलन करीत पाहुण्यांना मानवंदना दिली. यावेळी पोलिस बँडनेही उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ.वाल्मिक सरवदे, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे, संचालक (मानव संसाधन) अरविंद भादीकर, प्रादेशिक संचालक (नागपूर) सुहास रंगारी उपस्थित होते. यावेळी मुख्य अभियंता भुजंग खंदारे, कैलास हुमणे, परेश भागवत, सुनील काकडे, ज्ञानेश कुलकर्णी, दत्तात्रय पडळकर, अनिल डोये, सुंदर लटपटे, राजेंद्र पवार, दिलीप दोडके, मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) भूषण कुलकर्णी, स्पर्धेचे मुख्य समन्वयक तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार यांच्यासह महावितरणचे वरिष्ठ अधिकारी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटक ताकसांडे म्हणाले की, महावितरणचे कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी आणि त्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळण्यासाठी ही स्पर्धा उत्तम संधी आहे. डॉ.सरवदे म्हणाले की, कर्मचाऱ्यांना महावितरण अशा स्पर्धा घेऊन चांगले काम करण्यास प्रेरणा देते, ही आनंदाची बाब आहे. नियोजन, संघटन आणि समन्वयाचे दर्शन या स्पर्धेतून घडते. तर अध्यक्षीय समारोप करताना डॉ.केळे म्हणाले की, कर्मचाऱ्यांनी स्पर्धेतून नवीन ऊर्जा घेऊन त्याचा दैनंदिन कामात सकारात्मक उपयोग करावा. आपण ऊर्जा क्षेत्राचे पाईक आहोत. त्यामुळे स्पर्धात्मक पद्धतीने खेळाचे प्रदर्शन करावे.
स्पर्धा आयोजनाची संधी दिल्याबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी आभार मानले आणि सर्व सहकाऱ्यांच्या साथीने स्पर्धा यशस्वी करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांनी लेझीम नृत्य सादर केले. रूपाली पहूरकर व रमेश शिंदे यांनी यांनी सूत्रसंचालन केले. ज्ञानेश्वर आर्दड यांनी यांनी आभार व्यक्त केले. उद्घाटनानंतर लगेचच झालेल्या १०० मीटर धावणे स्पर्धेत पुरुष गटात सांघिक कार्यालय-भांडूप परिमंडलाच्या साईनाथ मसने याने प्रथम तर पुणे-बारामती परिमंडलाच्या गुलाबसिंग वसावे याने द्वितीय तर महिला गटात सांघिक कार्यालय-भांडूप परिमंडलाच्या प्रिया पाटील यांनी प्रथम क्रमांक तर कल्याण-रत्नागिरी परिमंडलाच्या मेघा झुंजारे यांनी द्वितीय क्रमांक पटकविला. त्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



## कर रचना 'जैसे थे'

आधुनिक केसरी

मोदी सरकारचा दहावा आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचा सलग सहावा अर्थसंकल्प गुरूवारी लोकसभेत सादर झाला. तीन महिन्यांत देशात लोकसभा निवडणुका होणार असून त्याआधीचा हा अंतरिम अर्थसंकल्प ठरला. या अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कररचनेत कोणताही नवीन बदल प्रस्तावित केलेला नाही. त्यामुळे आधीच्या जुन्या व नवीन कररचनेनुसार करदात्यांचे स्लॅब यापुढेही कायम राहतील. निवडणुकांनंतर जुलै महिन्यात नवीन सरकार पूर्ण अर्थसंकल्प सादर करेल. मात्र, या अर्थसंकल्पात एकीकडे कररचनेत बदल केला नसला, तरी दुसरीकडे एका निर्णयानुसार सामान्य करदात्यांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून करण्यात आला आहे. यानुसार, केंद्र सरकारने २०१० सालापर्यंतची २५ हजार रुपयांपर्यंतची करमागणी तर २०१० ते २०१४ सालापर्यंतची १० हजार रुपयांची करमागणी मागे घेत असल्याची घोषणा केली. त्यामुळे देशातील लाखो करदात्यांना त्याचा फायदा होईल, असा दावा निर्मला सीतारमण यांनी केला आहे. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेनुसार गेल्या काही वर्षांत जुन्या वादात अडकलेल्या प्राप्तिकराच्या मागणी प्रकरणांची संख्या वाढली होती. यामुळे अनेक करदात्यांना या वादाचा फटका बसत होता. मात्र, आता अर्थसंकल्पात ही घोषणा करण्यात आल्यामुळे २०१० सालापर्यंतच्या प्रकरणांमध्ये ज्यांची २५ हजार रुपयांपर्यंतची करमागणी प्रकरणे वादात होती, ती निर्लेखित करण्यात आली आहेत. अर्थात, आता अशा करदात्यांना हा करभरणा करण्याची आवश्यकता राहिली नाही. त्याचबरोबर २०१० ते २०१४ सालापर्यंत ज्यांची १० हजार रुपयांपर्यंतची करमागणी प्रकरणे वादात होती, त्यांना या रकमेचा करभरणा करण्याची आवश्यकता राहिली नाही. सामान्य प्रक्रियेनुसार करदात्यांकडून करपरतावा भरल्यानंतर त्यामध्ये काही तफावत आढळल्यास सरकारकडून अशा करदात्यांना तफावतीएवढा करभरणा पुन्हा करायला सांगितले जाते. मात्र, हे करदात्यास मान्य नसल्यास, त्यातून त्या वर्षासाठीचा करपरतावा वादात अडकतो. अशी प्रलंबित प्रकरणे असल्यामुळे अशा करदात्यांना त्यापुढील करपरतावा मिळण्यातही अडचणी येतात. जुन्या प्रलंबित करमागण्यांमुळे अशा करदात्यांना करपरतावा दिला जात नव्हता. आता या निर्णयामुळे त्या रकमेच्या आतील करदात्यांना त्यांचा प्रलंबित करपरतावा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षात ८.१८ कोटी करदात्यांनी परतावा भरल्याचा विक्रम झाला आहे. ही आकडेवारी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंतची आहे. याआधीच्या वर्षात ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत ७ कोटी ५१ लाख करदात्यांनी करपरताव्याची रक्कम भरली होती. एका वर्षात झालेली ही वाढ ९ टक्क्यांपर्यंत आहे.

## बळवंतरावांचे निपाणी गाव आणि बाबासाहेब




मिलिंद मानकर,
नागपूर, 8080335096

आधुनिक केसरी

**निपाणी गावाच्या वास्तव्य काळात डॉ. बाबासाहेबांची सावलीसारखी सोबत करणारे निष्ठावान अनुयायी बळवंत हनमंतराव वराळे निपाणी गावचे रहिवासी होते. त्यांची आज, दि. २ फेब्रुवारीला जयंती साजरी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांनी निपाणी गावाला दिलेल्या भेटीच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत... निपाणी हे भारताच्या कर्नाटक राज्याच्या बेळगाव जिल्ह्यातील एक नगर आहे. निपाणी कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवर स्थित असून बेळगावच्या ७५ किमी उत्तरेस तर कोल्हापूरच्या ३८ किमी दक्षिणेस राष्ट्रीय महामार्ग ४ वर आहे.**

निपाणीला मराठी भाषिक रहिवासी मोठ्या प्रमाणावर असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानणारा मोठा वर्ग या ठिकाणी आहे. बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात निपाणी गावाला तीन-चारदा भेट दिली होती. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या निपाणीच्या मातीतून आजही 'बाबा... बाबा...' असा नादमधुर मंगलध्वनी कानी पडल्याशिवाय राहत नाही! तसेच बाबासाहेबांची सहचारिणी रमाबाई आंबेडकर यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने सन १९३१ मध्ये हवापालट करण्यासाठी या घरी वास्तव्यास आल्या होत्या, ही बाबही विशेषच आहे. बाबासाहेबांच्या वास्तव्य काळात सावलीसारखी सोबत करणारे निष्ठावान अनुयायी बळवंत हनमंतराव वराळे हे याच गावचे रहिवासी होते. त्यांची आज, दि. २ फेब्रुवारीला जयंती साजरी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी निपाणी शहराला दिलेल्या भेटीच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत.

डॉ. आंबेडकरांनी येथील म्युनिसिपल हायस्कूलच्या पटांगणावर दलित समाजाला केलेले मार्गदर्शनपर भाषण आजही अनेकांच्या स्मरणात आहे. त्यांनी भेट दिलेली बळवंतरावांच्या निवासस्थानाची खोली आजही स्फूर्ती दे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पहिल्यांदा ११ एप्रिल १९२५ रोजी निपाणी गावाला आले होते. त्यावेळी निपाणी बळवंतरावांचे चिरंजीव ॲड. भालचंद्र वराळे आपल्या 'मी पाहिलेले बाबासाहेब' या लेखात म्हणतात, 'हे छायाचित्र अद्यापही माझ्या वडिलांकडे आहे आणि या छायाचित्राचा कार्यक्रम लक्षात राहण्याचे कारण एकच म्हणजे बाबांचे छायाचित्र ज्या घोड्यावर ते बसले असताना घेतला त्याच घोड्यावर भीतभीतच स्वार होण्याचा प्रसंग आमच्यावर आला.' दुसरीकडे बळवंतरावांचे नातू प्रसिद्ध गायक कुणाल वराळे त्या प्रसंगांची आठवण सांगतांना म्हणतात, 'बाबासाहेब ज्या घोड्यावर विराजमान झाले तो रुबाबदार घोडा निपाणी गावचा नामांकित घोडा होता. दत्तोबा कराळे यांच्या मालकीचा तो घोडा होता. सुरुवातीला बाबासाहेब घोड्यावर बसायला घाबरत होते. कराळे यांनी बाबासाहेबांची चार दिवस समजूत काढली त्यानंतर ते घोड्यावर बसायला तयार झाले.' बळवंतरावांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी आजही ते छायाचित्र पहावयास मिळते. त्या ऐतिहासिक छायाचित्राचे दर्शन घेण्याचे सद्भाग्य मला गतवर्षी प्राप्त झाले. बाबासाहेबांच्या पत्नी रमाबाईपेक्षा बळवंतराव चार वर्षांनी लहान होते. पण 'आईसाहेब' अशी हाक मारत. त्यांच्या मुलाचा नामकरण विधी रमाईने करून त्याला 'भालचंद्र' असे नाव दिले होते. तोच बाळ कालांतराने प्रसिद्ध न्यायमूर्ती भालचंद्र वराळे म्हणून नावारूपास आला. रमाई बळवंतरावांना 'मास्तर' संबोधित. तर कार्येकर्ते त्यांना 'वराळे मामा' या गोंडस नावाने हाक मारीत. रमाईवर त्यांनी अभंग, कविता लिहिल्या. १९३३ साली त्यांच्या 'अत्यंजाचा पाळणा' नावाचा छोटासा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. बाबासाहेबांच्या 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' इ. साप्ताहिकांतून त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांची पत्रे कवितारूपाने असत. बाबासाहेबांनी ३० ऑक्टोबर १९३८ रोजी निपाणी नगरपालिकेला भेट दिली. त्यावेळी नगराध्यक्ष देवचंद



शाह यांनी त्यांचा नगरपालिकेच्या वतीने मानपत्र देऊन सन्मान आणि सत्कार करण्यात आला होता. १९५२ साली बाबासाहेबांची आणखी एक जाहीर सभा बळवंतरावांनी निपाणीला आयोजित केली होती. त्या सभेत बाबांच्या सत्काराप्रीत्यर्थ बळवंतरावांनी गुणगौरव करणारे एक सुंदर गीत रचले होते. हे गीत सादर करण्यासाठी त्यांनी आपल्या लाडक्या लेकीला (इंदुमती) पाचारण केले. इंदुमतीने गीत गाण्यास सुरवात केली. जसजसे गीताचे एक एक कडवे संपू लागले तसे बाबांचे डोळे अश्रूंनी भरून आले. बाबांच्या अद्वितीय थोरवीचे आणि असंख्य गुणांचे गुणगान त्या गीतात होते. बाबा थोडा वेळ भारावून गेले होते. तेच सुरेल गीत इंदुमतीने १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर गायिले. धम्मदीक्षा विधीची सुरुवात इंदुमतीच्या स्वागतगीताने झाली. या प्रसंगीही बाबासाहेब इंदुमतीच्या सुश्राव्य गायनाने प्रभावित झाले होते.

निपाणीची सभा संपल्यानंतर बाबासाहेबांनी नगरपालिकेच्या मागील बाजूस असलेल्या बळवंतरावांच्या घरी दोन तास वास्तव्य केले. बाबासाहेब ज्या पलंगावर बसले तो पलंग आजही बळवंतरावांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत वराळे यांच्या घरी सुरक्षित आहे. तसेच बाबासाहेबांच्या निपाणी येथील दुर्मिळ छायाचित्रांचा संग्रह, इतिहासाचा ठेवा जतन करण्याचे काम निपाणी येथील आर्टिस्ट दीपक मधाळे आणि संतकुमार मधाळे बंधू मोठ्या हिरीरीने करीत आहेत. गेल्या ३० वर्षात मधाळे बंधूंनी विविध शाळा महाविद्यालयात प्रदर्शन भरवून जनतेचे प्रबोधन केले आहे. बळवंतरावांच्या घरी बाबासाहेब आले होते. त्यांच्या काही चिरंतन स्मृती या बंधूंनी जतन केल्या आहेत. त्यांच्या स्मृतीचे स्मारक उभारण्यासाठी गव्हाणी येथील दहा एकर जागेसोबत एक कोटीचा निधीही शासनाने मंजूर केला आहे. या स्मारकासमोरच बाबासाहेबांचा घोड्यावर बसलेला पुतळा उभारण्यात येणार आहे. 'डॉ. आंबेडकरांचा सांगाती' या ग्रंथातून बाबासाहेब व रमाईंच्या सहवासातील (१९२५ ते १९५६ ) मनविहाराला चटका लावणाऱ्या अनेक हृदयस्पर्शी आठवणी बळवंतराव वराळे यांनी लिहून चिरस्मरणीय कार्य केले आहे. बळवंतराव वराळेसारखा स्वाभिमानी, प्रामाणिक, निष्ठावंत, आदर्श कार्यकर्त्याची आज आंबेडकरी समाजाला नितांत गरज आहे. जयंतीनिमित्त पावन स्मृतीला विनम्र अभिवादन.

## संत तुकारामांचा समतावादी दृष्टिकोन



कल्पना घुगे-बामणे,
छत्रपती संभाजीनगर

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडात अनेक पंथ उदयास आले.त्यात नाथ संप्रदाय,वारकरी संप्रदाय,समर्थ संप्रदाय, महानुभव संप्रदाय इ.संप्रदायांचा समावेश होतो.त्यातील एकूण संप्रदायांचा जर विचार केला तर असे लक्षात येते की,अगदी सहज-सोप्या,सुलभ विचारांनी -आचारांनी जनतेला अगदी जवळचा वाटणारा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय.या वारकरी संप्रदायातील संतांच्या मेळ्यात बहूजन समाजातील अनेक संतांचा समावेश होतो.या सर्व संत मेळ्यात वारकरी संप्रदायाचा कळस ठरणारे संत म्हणजे ' जगद्गुरु संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज' होय.**

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून समाजाला दिलेले दान हे त्रिकालबाधित अनंतकाळ टिकणारे दान आहे.त्याच्या शब्दसागरातील भाव हा समाजाला तारणारा आहे.संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून एका परिवर्तनवादी समाजाची मांडणी केलेली आहे.तसेच तुकारामांनी अभंगांची मांडणी करत असताना दृष्टांत,प्रमाण ही सर्वसामान्यांच्या व्यवहारातील दिल्याने ते अधिक उंचीचा पल्ला गाठतात. वैदिक संस्कृतीत वेद,पुराण, कर्मकांड यांना अधिक महत्त्व देण्यात आले.पण यामुळे समाजात वर्णव्यवस्था निर्माण झाली व त्यातून पुढे जातीव्यवस्था ही जन्माला आली.या जातीवादी व्यवस्थेमुळेच समाजात अनेक प्रश्न निर्माण झाले.समाजाला गुलामगिरी,शोषण,स्त्रियांना दुय्यम दर्जा अशा एक ना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागले.यामुळे समाज व्यवस्थेची घडी ही पार विस्कटून गेली.परंतू या विस्कटून



गेलेल्या परिस्थितीत समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी संत तुकारामांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून विषमतावादी व्यवस्थेवर शब्दशस्त्राने प्रहार केला व समतावाद प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या या समतावादी दृष्टीकोनाचा आढावा आपल्याला पुढीलप्रमाणे घेता येईल.

हिंदू धर्म संस्कृतीत वैदिक व अवैदिक हे दोन प्रकार आपल्याला दिसून येतात.हिंदू संस्कृतीत वैदिक संस्कृती महत्त्वपूर्ण मानली जाते.या वैदिक संस्कृतीने मानवजातीची विभागणी ही चार वर्ण प्रकारांमध्ये केलेली आहे.यामुळे साहजिकच व्यक्तीचे श्रेष्ठत्व हे त्याच्या जन्मावरुन ठरवण्यात येऊ लागले.समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपला वर्ण,जात-धर्म हा इतरांपेक्षा अधिक श्रेष्ठ वाटू लागला.यातून प्रत्येकात अहंकारी वृत्ती निर्माण झाली व या अहंकारी वृत्तीमुळेच विषमतेला अधिक खतपाणी मिळाले.सबब समाजात विषमता ही अधिक जोमाने वाढत गेली.अशा काळात समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी संत तुकारामांचे अभंग हे समाजातील सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारे,समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनाला उभारी देणारे ठरले.तुकोबांचे काव्य स्वतःच्याच विश्वात रमणारे किंवा कठीण परिस्थितीत रडत बसणारे नाही,तर मानवी जीवनाच्या वास्तवाला भिडणारे आहे. मानवाला लढायला लावणारे आहे,त्याची मनोवृत्ती संघर्षासाठी तयार करणारे काव्य आहे.फिनिक्स पक्षाप्रमाणे त्याला राखेतूनही आकाशात उंच उंच भरारी घ्यायला लावणारे संत तुकारामांचे अभंग हे सामाजीक जीवनाला दिशादर्शक ठरतात.त्यात समतावादी दृष्टीकोनाचे दर्शन आपणांस घडते.

संत तुकारामांनी समाजातील विषमता कशाप्रकारे मोडून काढली,हे आपल्याला त्यांच्या अभंगांच्या चरणांमधून दिसून येते. संत तुकारामांनी आपल्या अनेक अभंग रचनेतून समानतेची जी शिकवण दिलेली आहे, त्यातील एका अभंगात संत तुकाराम म्हणतात की, विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।१।। आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।२।। कोणाही जीवाचा न घडवा मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ।।३।। तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुखदुःख जीव भोग पावे ।।४।। **क्रमशः**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मराठा आरक्षणाचा अध्यादेश फाडून धुळ्यात तीव्र निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने काढलेला अध्यादेशाचा मसुदा फाडून आज धुळ्यात ओबीसी समाजाने जिल्हाधिकारी यांच्या आवारात तिव्र आंदोलन केले.धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात निदर्शने करीत मराठा समाजाला ओबीसीत सामावून घेत आरक्षण देण्यासाठी सरकारकडून होत असलेल्या कार्यवाहीचा तिव्र विरोध करण्यात आला. अ.भा. महात्मा फुले समता परिषद आणि ओबीसी संघटनांनी एकत्र येत अध्यादेशाची प्रत फाडून विरोध दर्शविला. यावेळी सविस्तर निवेदनही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. या निवेदनात प्रामुख्याने महाराष्ट्र सरकार नियुक्त न्या. संदीप शिंदे समिती ही फक्त मर्यादित समिती असून मागासवर्ग आयोग नसताना मराठा (कुणबी) जात नोंदींचा शोध घेऊन कोणत्याही राज्य किंवा राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला मागास ठरविलेले नसताना समितीच्या शिफारशीवरून प्रशासनाकडून मराठा कुणबी प्रमाणपत्राचे वितरण केले जात आहे. भारतीय संविधानातील आर्टिकल ३३८ (ब) प्रमाणे उपरोक्त निकालाच्या



आधारे संबंधित जाती घटकाबाबत इंटिग्रिटी किंवा आसक्ती नसलेले सदस्य नियुक्त करणे अपेक्षित असताना मा. न्या. सुनील सुक्रे, श्री ओमप्रकाश जाधव, प्रा. अंबादास मोहिते या मराठा आरक्षण या विषयाबाबत आसक्ती असलेल्या व्यक्तींच्या मागासवर्ग आयोगावर नियुक्त्या कशा केल्या. जर नियुक्त्या करायच्या होत्या तर मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डॉ. जयश्री पाटील विरुद्ध मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य २०२१ (८) SSC ( ) व माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास १९९७ (५) डउउ (४३७) १९९४ व इंदिरा साहनी विरुद्ध भारत सरकार १९९२ SUPP (३) SSC २१७, खटल्यातील निकालानुसार अपेक्षित असलेल्या मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांच्या आंदोलनाच्या दबावाखाली राज्यातल्या प्रस्थापित जमीनदारांना मागास ठरविण्याचे षडयंत्र केले जात आहे असा आरोप या ठिकाणी करण्यात आला.

तरी अशा पद्धतीने दिले जात असलेले प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया तात्काळ थांबविण्यात यावी. आदी मागण्या केल्या आहेत. यावेळी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेश बागुल, ओबीसी नेते दिलीप देवरे, बापू महाजन, माजी नगराध्यक्ष हनुमंत वाडीले, राजकिशोर तायडे, प्रा. अण्णा माळी, गोपाल देवरे, बी.एन. बिरारी, विलासराव माळी, बिपीनचंद्र रोकडे, डॉ. सुनिल वाघ, एकनाथ माळी, रत्नाकर माळी, सुरेश बोरसे, नितीनकुमार रोकडे, राजेंद्र गवळे, ईश्वर माळी, भुषण पाटील, कांतीलाल माळी, कैलास माळी, महेंद्र जगताप मनोहर रोकडे अशोक अहिरे, रविंद्र खैरनार, ॲड. योगेश चौधरी, संतोष खैरनार, राजेंद्र पाटील, संतोष बिरारी, हिरामण चौधरी, हरीश्चंद्र रेडे, प्रविण माळी, ज्ञानेश्वर माळी आदी उपस्थित होते.




# संगीता ठलाल यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कुरखेडा :** मैत्रीकट्टा कवीमनाचा समूहाच्या संस्थापिका कवयित्री, लेखिका अलका धोंडणे साखरे यांनी दुसरे साहित्य संमेलनाचे आयोजन दि.२८ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित केले होते. मंचावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचा सत्कार तसेच साहित्यिकांना पुरस्कार वितरणाचे आयोजन केले होते व दुसऱ्या सत्रात निमंत्रितांचे कवीसंमेलन घेण्यात आले . तसेच तीन संग्रहाचा प्रकाशन सोहळा सुध्दा पार पडला. त्या साहित्य संमेलनासाठी कुरखेडा येतील साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल यांना कवयित्री अलका साखरे लिखित प्रभातपुष्प सुविचार संग्रहासाठी भाष्यकार म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. मान्यवरांच्या उपस्थितीत तसेच निमंत्रित कवी, कवयित्रींच्या व जमलेल्या श्रोतांच्या उपस्थितीत मैत्रीकट्टा कवीमनाचा समूहाच्या संस्थापिका अलका साखरे यांच्या शुभ हस्ते संगीता ठलाल यांना पुष्पगुच्छ, शाल व आकर्षण सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्या शुभ प्रसंगी उद्घाटक कैलास धोडणे,वनपरिक्षेत्र अधिकारी ब्रह्मपुरी, कुरखेडा येतील नगरसेविका प्राची धोंडणे, संमेलनाध्यक्ष जेष्ठ साहित्यिक कांबळे, प्रमुख पाहुणे डॉ.आवटे कवी व साथरोग तज्ञ, डॉ. संजय कार्लेखर किटक शास्त्रज्ञ, क्रेंद्रप्रमुख अनिल साखरे, अस्तिन चौरे प्रसिद्ध कवी,शोभा वेले सामाजिक कार्यकर्त्या, कवयित्री अलका साखरे, डॉ.यमूना नाखले सुत्रसंचालक संतोष मेश्राम, सुनील काळमेघ तसेच विचारवंत साहित्यिक त्यांचे नातेवाईक व बहुसंख्येने कवीवर्ग उपस्थित होते. हा सत्कार होताना पाहून संगीता ठलाल गहिवरून गेल्या व अलका साखरे तसेच त्यांच्या समूहाचे व संपूर्ण टिमचे धन्यवाद मानले.

# महारोजगार मेळाव्याला बहुसंख्य तरुणांनी उपस्थित रहावे : राकाँ नेते रामभाऊ जाधव

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल देऊळगाव राजा येथे दिनांक ४ फेब्रुवारी रोजी मा.आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्या संकल्पनेतून महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आज समाजापुढे प्रामुख्याने असलेल्या प्रश्नांपैकी अतिशय महत्त्वाचा प्रश्न म्हणजे बेरोजगारी आहे. ग्रामीण भागांमध्ये अनेक तरुण विविध विषयांमध्ये पदवी पदवीत्तर शिक्षण घेऊन बेरोजगार आहेत, अशा सर्व तरुणांसाठी सर्वसामान्य माणसांसाठी अहोरात्र झटणारे नेतृव आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे स्वतःच्या खर्चाने पन्नास विविध प्रकारच्या कंपण्यांचे अधिकारी एकाच ठीकाणी बोलावुन बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून ८ वी १० वी १२ वी B.A, BSC,B.CO,MCOM,B.B.A,MBA पॅरा मेडीकल अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या तरुणांसाठी त्यांच्या पात्रते नुसार जागेवर मुलाखत घेवुन उपलब्ध असलेल्या जागा भरल्या जाणार आहेत.व या महारोजगार मेळाव्या मध्ये या तरुणांना नौकरी मिळाली नाही,अशांना जशा जशा जागा उपलब्ध होतील.त्या पद्धतीने नोकऱ्या मिळणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी हि सुवर्ण संधी आहे.तरी ह्या संधीचा साखरखेर्डा सर्कल मधील तरुण,तरुणींनी दिनांक ४ फेब्रुवारी देऊळगाव राजा येथे होत असलेल्या महारोजगार मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिप गटनेते रामभाऊ जाधव यांनी केले आहे.

# रेल्वे लोक आंदोलनाच्या उपोषणाला पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** गत अनेक वर्षापासून जालना खामगाव रेल्वे मार्ग व्हावा अशी मागणी आहे.ह्या मागणीसाठी चिखली येथे रेल्वे लोक आंदोलन समितीच्या कार्यकर्त्यांकडून चिखली तहसील समोर सत्याग्रह व साखळी उपोषण सुरू आहे.गेल्या २२ जानेवारीपासून सुरू या आंदोलनाला देऊळगाव राजा तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी पाठिंबा दर्शविला असून तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे.

तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की रेल्वे बोर्डाकडून खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी अपेक्षित 50 टक्के निधी राज्य शासनाने त्वरित मंजूर करावा, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ७ ऑगस्ट २०१४ रोजी खामगाव जालना मार्गासाठी दिलेले आश्वासन पूर्ण करावे. केंद्र शासनाने खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी तात्काळ मंजुरी द्यावी, शासनाने रेल्वे लाईन जमीन संपादन करण्यासाठी तात्काळ प्रक्रिया सुरु करा,कालबद्ध कार्यक्रमांतर्गत येत्या पाच वर्षात रेल्वे मार्ग पूर्ण करावा,अशा विविध मागण्या सदर निवेदनाद्वारे करण्यात आल्या. या निवेदनावर राष्ट्रवादीचे राजेश इंगळे, शिवसेना उबाठा चे गोविंद झोरे, राष्ट्रवादी (अजीत)चे गणेश सवडे,अमोल गंगाधर जाधव, भाजपचे ॲड.राजू मांटे, काँग्रेसचे विष्णू झोरे, हनीफ शहा,मनसेचे बंडू डोळस,आप चे मंगेश तिडके, शिवसेना (शिंदे ) प्रभाकर खांडेभराड,श्याम बनकर,अशोक माळोदे,श्रीराम पुंगळे, वसंतआप्पा खुळे, वसंत खांडेभराड,रितेश देशमुख, पत्रकार मुशीरखान कोटकर,अशोक डोईफोडे,गणेश आडे, जाकीर खान,मोहसीन खान, ज्ञानेश्वर शेळके,मधुकर मुख्यदल,किशोर जामदार,शंकर वाघमारे, अमोल उदयपूरकर, आदींची उपस्थिती होती.

# ऊसतोड कामगार हा साखर कारखानदारीचा महत्त्वाचा घटक : न्यायाधीश कोळसे

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** उसतोड़ मजूर व कामगार हे साखर कारखानदारीतील अत्यंत महत्त्वाचे घटक असून तेच साखर कारखानदारीचा व साखर उत्पादनातील पाया असल्याचे मत कन्नड न्यायालयाचे न्यायाधीश मा .श्री. कोळसे यांनी मौजे भोकनगाव येथे तालुका विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समिती तसेच कन्नड न्यायालयाचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या कायदेविषयक शिबिराचे प्रसंगी ऊसतोड मजूर कामगारांसमोर बोलताना व्यक्त केले. शासकीय धोरणाप्रमाणे सर्वसामान्य जनतेला त्याच्या जीवनात आवश्यक असणाऱ्या जुजबी कायद्यांची माहिती व्हावी, तसेच समाजातील सर्वसामान्य घटकांना देखील आवश्यक त्या कायद्याची माहिती व्हावी, या उद्देशाने वेळोवेळी न्यायालयाच्या वतीने जनतेच्या विविध स्तरांमध्ये वेगवेगळे कायदे विषयक शिबिरांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून भोकनगाव येथे ऊसतोड मजुरांसाठी शिबिर घेण्यात आले. यावेळी कोळसे म्हणाले की सगळीकडे जगभरातील कामगार कायद्याबद्दल चर्चा होत असते, परंतु त्याबाबत सर्वसामान्य जनता ही अनभिज्ञ असते, म्हणून मुद्दाम अशा उपक्रमाद्वारे सर्वसामान्य जनतेपर्यंत त्यांना जीवनात आवश्यक असणाऱ्या व फायद्याच्या कायद्याची माहिती पोहोचविण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम राबविले जातात ...यावेळी त्यांनी ऊसतोड मजुरांना किमान वेतन कायदा, तसेच ऊसतोड स्त्रि मजुरांना मातृत्व लाभ. अशा प्रकारची माहिती यावेळी दिली .तसेच एकाच कंपनीत एकाच ठिकाणी एकाच हुद्द्यावर काम करणाऱ्या स्त्री व पुरुषांना देखील समान वेतन मिळू शकते. त्याचप्रमाणे कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ व त्यासंबंधी असलेले कायदे, भविष्य निर्वाह निधी संबंधीचे कायदे ...गोपीनाथ



मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ च्या अंतर्गत येणाऱ्या योजना बाबत सविस्तर माहिती त्यांनी सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून बोलताना दिली.. तसेच यावेळी नागरिकांनी उपस्थित केलेल्या कायदेविषयक प्रश्नांबाबत कन्नड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पाटील जाधव यांनी सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविक ॲड. अनंत शेजवळ तर, सूत्रसंचालन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता जालना पुरकर मॅडम यांनी केले ,तर सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड. दीपक मस्के यांनी केले.कन्नड न्यालयाच्या विधी सेवा प्राधिकरणच्या श्रीमती एस जी चव्हाण.यावेळी भोकनगाव ग्रामपंचायतच्या सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक वसंतराव खरे, बापू खरे, माजी सरपंच रमेश खरे, लक्ष्मण खरे, नानासाहेब जाधव व अन्य ग्रामस्थ तसेच ऊसतोड मजूर बहुसंख्येने उपस्थित होते.

# सरकारच्या दडपशाहीविरोधात राष्ट्रवादीचे घंटानाद आंदोलन

## स्वायत्त संस्थांच्या अधिकारांचा दुरुपयोग : शरद पवार निष्ठावंतांनी केला निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या स्वाय्यत्त संस्थांचा केंद्रातील भाजप सरकार दुरुपयोग करत असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, युवा नेते रोहित पवार यांच्यावर राजकीय आकस बुद्धीतून विनाकारण कारवाई करण्यात आली आहे. या दडशाहीच्या विरोधात व जनसामान्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या मार्गदर्शनात युवा नेतृत्व तथा भर जहाँगीर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या नेतृत्वात निषेध म्हणून घंटानाद आंदोलन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने तहसिलदार प्रतिक्षा तेजनकर यांना निवेदन देण्यात आले आहे.

राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार यांच्यावर करण्यात आलेली इडीची कारवाई ही सरकारची दडशाही असून, लोकशाहीला मारक बाब आहे.त्याचा निषेध करण्यासाठी व जनसामान्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्याबाबत आज दि.१ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या मार्गदर्शनात युवा नेतृत्व तथा भर जहाँगीर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या नेतृत्वात येथील तहसील कार्यालयावर घंटानाद आंदोलन करण्यात आले आहे. जनसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी राज्य सरकार उदासीन असून, केंद्र सरकारने दडपशाहीचे धोरण अवलंबले असल्याचे मत अमित पाटील खडसे यांनी व्यक्त केले आहे. यावेळी तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांना समस्यांचे निवेदन देण्यात आले आहे. रिसोड येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयापासून निघालेल्या शेकडो मोर्चेकऱ्यांनी सरकारच्या दडपशाही विरोधात प्रचंड घोषणाबाजी करत तहसिल कार्यालयावर घंटानाद आंदोलन केले. यावेळी राज्य व केंद्र




सरकारच्या धोरणाबाबत प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. राज्यात युवा,विद्यार्थी, शेतकरी, बेरोजगार, कामगार, अंगणवाडी कर्मचारी व महीला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असतांनाही सरकार मात्र मूग गिळून गप्प असल्याचा आरोप राष्ट्रवादी पक्षाने केला आहे. तद्वतच बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी रिसोड येथील औद्योगिक वसाहतीला चालना देण्यासाठी सरकारचे लक्ष वेधण्यात आले आहे. राज्यात एखादा मोठा प्रकल्प उभा करण्याऐवजी हे सरकार राज्यातील प्रकल्प बाहेर राज्यात विशेषतः गुजरातला पाठवीत आहे. त्यामुळे राज्यातील बेरोजगारांची संख्या लक्षणीय वाढत आहे. युवा पिढी पदवीचे धांडोळे हातात घेऊन वणवण भटकत आहे. मात्र राज्य सरकार महाराष्ट्राचे हक्काचे प्रकल्प जाणीवपूर्वक बाहेर पाठवत आहे. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. त्याची दखल घेण्याऐवजी सरकार सपशेल दुर्लक्ष करत आहे. केन्द्र सरकारच्या दडपशाही धोरणाविरोधात आजचे हे घंटानाद आंदोलन करण्यात आले असल्याचे तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तद्वतच विद्यार्थ्यांच्या रखडलेल्या शिष्यवृत्या त्वरीत वितरीत करण्याची मागणी करण्यात आली असून, सारथी, बार्टी, महाज्योती, टिआरटीआय या संस्थांना प्रत्येकी १०० कोटीचा निधी उपलब्ध करुन देवून त्यांचे सक्षमीकरण कारण्याची मागणी सुद्धा करण्यात आली आहे.

महीला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असून, महीला सक्षमिकरणासाठी सरकारने ठोस भूमिका घ्यावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.दरम्यान आमच्या घंटानाद आंदोलनाची सरकारने दखल न घेतल्यास हा लढा आणखीन तीव्र करण्यात येईल असा इशारा युवा नेतृत्व अमित पाटील खडसे यांनी दिला आहे. यावेळी तालुकाध्यक्ष गजाननराव सरनाईक, जिल्हाउपाध्यक्ष कैलासराव खानझोडे, सरचिटणीस डॉ. माधवराव जाधव, बाळासाहेब देशमुख, रवि नरवाडे, रामभाऊ हुंबाड, माधव शेवाळे, मुरलीधर जुनघरे, भागवत बोडखे,डॉ. गजानन बाजड आदींसह पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडोच्या संख्येने शरद पवार निष्ठावंताची उपस्थिती होती.

# बल्लारपूर येथे महिला स्नेहमिलन व हळद कुंकू समारंभ

आधुनिक केसरी न्यूज




**बल्लारपूर :** येथील मंगलमूर्ती लॉन येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख माननीय श्री संदिप भाऊ गिऱ्हे यांचे संकल्पनेतून महिला शिवसेना आघाडी च्या वतीने महिला विधानसभा समन्वयक कल्पना ताई गोरघाटे, नगरसेविका रंजीता ताई बीरे, तालुका अध्यक्ष मीनाक्षी ताई गलघट, शहर अध्यक्ष ज्योती ताई गेहलोत, माजी नगरसेविका सुवर्णाताई मुरकुटे, युवती सेना शहर अध्यक्षा अंजली ताई सोमबंसी,करुणाताई शेगोकार,लावारी उपसरपंच राजुरकर ताई, उप शहर अध्यक्षा वैष्णवी ताई लिचोडे, प्रगती ताई झुल्लारे, ज्योतीताई गुप्ता, व इतर महिला पदाधिकारी तसेच कार्यकर्ते यांच्या माध्यमातून मकर संक्रांतीच्या निमित्ताने महिला मेळावा व हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात हजारोच्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा प्रमुख संदीप भाऊ गिऱ्हे, उपजिल्हा प्रमुख सिक्की भैय्या यादव, तालुका प्रमुख प्रकाश भाऊ पाठक, युवासेना समन्वयक प्रदीप भाऊ गेडाम, शहर प्रमुख बाबा शाहू ,डॉ. हजारे मॅडम, अधिवक्ता मेघा भाले, मुख्यध्यापिका शमीम मॅडम,श्रीमती प्रेमलता मालुसरे, सौ.प्रेमलता काबरा या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी जिजा फाँऊडेशन अध्यक्षा मनस्वी ताई गिऱ्हे यांची प्रमुख उपस्थिती लाभली व त्यांनी आपले मनोगत व्यक्त करत महिलांना सक्षम करण्यासाठी आम्ही नेहमीच पुढाकार घेत असतो , सर्वांनी मिळून मिसळून राहणे गरजेचे आहे तसेच आपल्या भागातील महिलांच्या कोणत्याही समस्या असतील तर आम्ही तुमच्या सोबत कायम आहोत असे आश्वासन दिले. या कार्यक्रमात महिला आघाडीच्या वतीने महिलां साठी विविध उपक्रम, विविध स्पर्धा तसेच हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले व विविध स्पर्धांमध्ये विजयी अनेकांनी यश मिळवले.या कार्यक्रमात बल्लारपूर शहरातील तसेच ग्रामीण भागातील महिलांनी हजारो च्या संख्येने सहभाग घेतला. या कार्यक्रमामुळे महिलांमध्ये उत्साह निर्माण झाला. कार्यक्रमास मार्गदर्शन करतानी जिल्हा प्रमुख संदीप भाऊ गिऱ्हे व उपजिल्हा प्रमुख सिक्की यादव यांनी सर्व महिला पदाधिकारी तसेत महिलांचा व मंगल मुर्ती लॉन च्या संचालक प्रशांत मेश्राम यांचे आभार प्रकट केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी उप शहर प्रमुख आनंद हनमंत्तु , सचिन अंबादे, विनोद बुराडे, रामू मेदरवार, शेख युसूफ, प्रभाकर मुरकुटे, दिनेश लिचोडे, बॉबी कादासी, सुरेंद्र संधू, अनिकेत बेलखोडे, सोनु श्रीवास, अबील जोग, सोनू बेनी, सुधीर कालापेल्ली, मल्लेश अण्णा, धर्मा बानोत, तुलसी बानोतसह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे महिला पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# युवकांना श्रमदानातूनच मिळू शकतो रोजगार : डॉ. जयराम घोती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आज दिनांक एक फेब्रुवारी 2024 रोजी जय कालंका देवी शिक्षण संस्था संचलित कै. लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा यांचा राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दरवर्षी एक गाव दत्तक घेऊन विशेष श्रमदान शिबिर आयोजित करण्यात येते या श्रमदान शिबिरामध्ये प्रमुख्याने विद्यार्थ्यांमध्ये श्रमदानाचे महत्त्व रुजावे म्हणून पाणी आडवा पाणी जिरवा, झाडे लावा झाडे जगवा, स्वच्छतेकडून समृद्धीकडे , ग्रामविकास हेच ध्येय असे विविध प्रकारचे सात दिवसीय श्रमदान शिबिर आयोजित करून विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्त्व सांगितले जाते तेव्हा आज श्रमदानाच्या समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक व क्रीडा शिक्षक डॉ.जयराम घोती विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगितले कि, युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षण क्षेत्राद्वारे होत असताना दिसत आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. तरुणांमध्ये समाजसेवेची जाण झाल्यानंतर त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे राष्ट्रसेवा होय.राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सांगताना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्त्व विशद करतात. याप्रसंगी प्राचार्य पाटील व संस्था अध्यक्ष भाऊराव कोलते व संचालक मंडळ तसेच गावातील सरपंच समीर खातडवी उपसरपंच मिराबाई उत्तम चव्हाण, प्रतिष्ठित नागरिक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक योगेश थोटे, डॉ. पंजाबराव शेळके डॉ.प्रवीण सरकटे, अजय रबडे, दीपक सिसोदे योगेश शेळके मनोहर पडोळ प्रदीप पाटील, गणेश मोहने, संजय अमृतकर, गणेश सत्रे, किशोर चोपडे रोशन काळे विनोद चव्हाण राहुल बडक, पत्रकार गोकुळसिंग राजपूत, रहीम पठाण, सुनिल चोरमले, जबाबर एस तडवी, बहादुरसिंग चव्हाण, सुनिल चोरमले तसेच इतर मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

# मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना कामांना मुहूर्त मिळेना

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** महाराष्ट्र शासनाच्या अभिनव योजना मी समृद्ध तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर माझा महाराष्ट्र समृद्ध ही संकल्पना मनरेगा कामांना खुलताबाद तालुक्यात मुहूर्त मिळत नसल्याने गत दिडदोन वर्षांपासून कामे रखडून असुण निधी उपलब्ध असताना चालढकल मुळे कामे रखडून असल्याचे चित्र आहे.

पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना राबविण्याचा शासन निर्णय सन२०१८केलेले आहे.यामधे रस्त्यांची वर्गवारी आहे त्यात एका गावाहून दुसऱ्या गावाला जाणारे रस्ते,शेतावर जाण्याचा गाडी मार्ग या प्रकारच्या वर्गवारी मोडणारे बाजार सावंगी ते शिरोडी बु रस्ता हा गाडी मार्ग व सावंगी ते सोनवणे वस्ती आदि व अन्य तालुक्यातील रस्ते या योजनेत मंजूर असताना व निधी उपलब्ध असताना तथा तालुका पंचायत समिती आम सभेत गाजलेला हा प्रश्न मार्गी लागत नाही.यात निव्वळ चालढकल सुरु आहे.

ग्रामपंचायत ते वरिष्ठा पर्यंत याकामाचा पाठपुरावा करुनही मार्गी नसल्याने निधी असताना नागरिकांना नहक्क रस्ते विना त्रास सहन करावे लागत आहे. वरिष्ठांनी या योजनेची दखल घेऊन तातडीने काम मार्गी लावावे असी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.




# धनगर समाजाचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** धनगर समाजाला राज्यघटनेने आदिवासी एस.टी.चे अनुसूचित जमातीचे आरक्षण दिली आहे मात्र शासन धनगर व धनगड या शब्दाचा भेद करून धनगर समाजाची आजवर दिशाभूल करीत आले आहेत यापुढेही शासनाने धनगर समाजाची दिशाभूल न करता धनगर समाजाला घटनेप्रमाणे एसटी आरक्षण अनुसूचित जमाती चे आरक्षण त्वरित द्यावे या मागणी करिता धनगर समाज योद्धा नंदु भाऊ लवंगे यांनी दिनांक 29 जानेवारी 2024 पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे राज्यघटनेत या समाजाची नोंद अनुसूचित जमातीमध्ये असून आज पर्यंत त्याची अंमलबजावणी झाली नाही आणि या समाजाला अनुसूचित जमातीची कुठलीही लाभ मिळत नाही त्यामुळे आज या समाजाची परिस्थिती अत्यंत हलाखीची आणि बिकट झालेली आहे आम्ही जे आरक्षण मागत आहोत ते आम्हाला घटनेने दिलेले आहे मात्र त्यात धनगर व धनगड या शब्दाचा घोळ शासनानेच घातलेला आहे त्यावर ही राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील धनगर समाजाचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे सादर करताना राज्यात कुठेही धनगड ही जात आढळून आली नसल्याचे म्हटले आहे राज्यात फक्त धनगर ही एकच जात आहे त्यामुळे अनुसूचित जमातीचे एस. टी. आरक्षण हे आमच्या हक्काचे आहे ते एवढीच आमची मागणी आहे या मागणीसाठी धनगर समाज योध्दा नंदु भाऊ लवंगे हे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहे यांना वंचित बहुजन आघाडी व माजी आमदार विजयराव शिंदे.अशा वेगवेगळ्या संघटनांनी व राजकीय नेत्यांनी त्यांच्या भेटी घेऊन त्यांना पाठिंबा दर्शविला आहे.



# पाणीपुरवठा योजनेचा कारभार पाहतो सातवी पास

आधुनिक केसरी न्यूज

बि. डी. रामपूरकर

जिंतूर : मागील दीड दोन महिन्यापासून जिंतूर शहरात नागरिकांना पाण्यासाठी वन वन भटकावे लागत आहे. यासाठी आमच्या प्रतिनिधीने जिंतूर शहरात होणाऱ्या पाणी पुरवठा वाटर पंपावर जाऊन माहिती घेतली असता शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेत जुने नगरपालिकेचे वॉटर पंपचा वापर होत असल्याने जिंतूरकरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेचे टेंडर काढून एका ठेकेदाराला टेंडर दिले असता त्या ठेकेदार कडे एकही टेक्निकल कामगार नसल्याने सातवी पास व स्वतः अनपड आहे अस म्हणणारा ठेकेदाराचा माणूस काम पाहत आहे. त्याला विचारण्यात आले तुम्ही हे काम कसे पाहतात तर तो म्हणतो मला हे काम येते म्हणून मी पाहतो. मी काही शिक्षित नाही मी अशिक्षित मानुस आहे.

जिंतूर नगरपालिकेचे जुने विद्युत मोटर नवीन पाणीपुरवठा योजनेत सध्या वापर सुरू असल्याने तेही मोटर जळाल्याने जिंतूर शहर वासियांना पाण्यासाठी म्हणून फिरावे लागत आहे. ठेकेदार नवीन वॉटर पंप आणत नसल्याने शहरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. याकडे कोणतेही प्रशासकीय अधिकारी लोकप्रतिनिधी लक्ष देत नसल्याने शहरात उलट सुलट चर्चा सुरू आहे. ठेकेदाराचे कामगार जे सध्या काम पाहत आहे त्यांना नवीन फिल्टर बद्दल विचारले असता DSR चे भाव वाढल्याने नवीन फिल्टर करणार नसल्याचे त्यांनी सांगितले. जे की नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत 2019 ते 2023 पर्यंत होती परंतु नगरपालिकेच्या गलथान कारभारामुळे आजपर्यंत ही या योजनेचे काम पूर्ण झाले नसून आज डिएसआर चे भाव वाढल्याने नवीन फिल्टर होणार नसल्याचे ठेकेदाराचे कामगार सांगत आहे. विशेष म्हणजे या नविन पाईप लाईन च्या कामाकडे




जिंतूर नगरपरिषदेचे ईजिनिअर लाही वेळ कसा मिळत नाही. ही एक शोकांतिकाच म्हणायचे की काय ? असा प्रश्न ही नागरिकांसमोर 'आ ' वासुन उभा दिसतो. एकुणच प्रशासन किती उदासीन आहे यांचे उत्तम उदाहरण येथे पहावयास मिळते.
तर नवीन पाईपलाईन साठी जे आराखडा तयार करण्यात आला होता त्या आराखड्यात देखील पूर्ण पाईपलाईन आज पर्यंत झाली नसून राजकारणीच्या दबावाखाली आराखड्यातल्या व्यतिरिक्त मोकळ्या नवीन प्लॉटिंग वर पाईपलाईन केली असल्याचे ठेकेदाराच्या कामगाराचे म्हणणे आहे. व जे नागरी वस्ती राहिल्या आहेत त्या ठिकाणी नवीन पाईपलाईन करणार नाही असे त्यांचे म्हणने आहे .
येलदरी येथील जिंतूर शहराला पाणीपुरवठा होणाऱ्या वॉटर पंपाच्या समोरील पुलावर कॉलम वरच्यावर काँक्रिट न वापरता मोठाले गोटे वापरुन बांधले जात आहे. याकडे प्रशासन लक्ष देत नसल्याने शहरात उलट सुलट चर्चा सुरू आहे. या सर्व भोंगळ कारभाराची चौकशी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक उस्मान खान पठाण यांनी चौकशी करुन मागणी केली आहे. या सर्व प्रकारात जिंतूर चे नागरीक अनभिज्ञ असुन लोकप्रतिनिधींकडून सोयीस्कर मर्जीनुसार पाईप लाईन वळवले म्हणजे एक प्रकारे नागरिकांवर अन्यायकारक असुन या बाबत परभणीचे जिल्हाधिकारी यांनी वेळीच हस्तक्षेप करून वरीष्ठा मार्फत चौकशी करण्यात येवुन संबधित विरुध्द वेळेत काम न केल्याने व ते निष्काम दर्जाचे असल्याने चौकशीची मागणीही समाजसेवक व माजी नगरसेवक उस्मानखॉ पठाण करत आहेत.



# संत एकनाथ शेतकरी विकास पॅनलचा प्रचार नारळ फुटला

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** कधी काळी संत एकनाथ सहकारी साखर कारखाना ताब्यात घेण्यासाठी पैठण तालुक्यातील मात्तबर पुढारी आप आपली राजकीय ताकद पणाला लावुन कारखाना निवडणूकीत वर्चस्व दाखवायचे परंतु यंदाच्या साखर कारखाना निवडणूकीत सचिन घायाळ ने नवीन चेहरे समोर करत सर्वसाधारण नागरिकांना संधी देत प्रस्तापित राजकारनी मंडळीला घायाळ केले. गुरवार 1 फेब्रुवारी रोजी ढोल ताशाच्या गजरात नाथांच्या दरबारी संत एकनाथ शेतकरी विकास पँनलच्या प्रचार शुभारंभाचा नारळ फोडून पँनल प्रमुख सचिन घायाळ याच्या उपस्थितीत करण्यात आला.
यावेळी सभेचे आयोजन करण्यात आले होते आम्ही कारखाना निवडणूकीला का सामोरे गेलो याची विस्तृतपणे मांडणी करत कारखाना भाडे तत्वावर चालवायला घेतल्यापासून आज पर्यंतचा हिशोब मांडुन विरोधकानीच कारखान्यावर प्रशासक बसवल्याने मतदार संख्या कमी झाली ती आम्ही केली नसल्याचे पुरावे देत संत एकनाथ कारखाना हा शेतकरी सभासदाचाच राहील असा विस्वास देत ,होय मिच नवीन सभासदाचे पैसे भरले असल्याचे सांगुन पुढील काळात कारखाना सुजलाम सुफलाम करुन दाखवु तथा कारखाना गाळप क्षमता वाढवून, डिसलरी प्लान उभारूध तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देवु असा सचिन घायाळ यांनी विस्वास व्यक्त केला. संत एकनाथ शेतकरी विकास पँनल प्रचार शुभारंभाप्रसंगी भाजपाचे सर्वच पदाधिकारी उपस्थित राहील्याने उपस्थितांमध्ये हा विषय चर्चेचा ठरला.
यावेळी भाजपा महीला प्रदेशच्या रेखाताई कुलकर्णी,माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, माजी उपनगराध्यक्ष जोशी, माजी चेअरमन तुषार शिसोदे, अक्षय शिसोदे, अमर शिसोदे, दत्तू मामा आम्ले, हरिभाऊ मापारी, प्रल्हाद औटे, विक्रम घायाळ, आबा मोरे, दत्ता वाकडे, भाऊसाहेब पिसे, भारत घायाळ, गणेश घायाळ, दिगंबर गोरडे, दीपक फांदाडे, कचरू बोबडे, रमेश झीने, कैलास तूपकरी, सुखदेव थोरात, शिवाजी जाधव, बाबासाहेब खराद, गणेश पवार, सुनील चितळे, अमोल घायाळ, रवींद्र घायाळ, अनिल रोडी, गणेश पवार आदी उपस्थित होते.

# बनावट जीएसटी अधिकारी ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बनावट जीएसटी अधिकारी म्हणून व्यापाऱ्यांना टाकणारे आरोपी निष्पन्न झाले आहेत त्यात महिलेचा देखील समावेश असून आत्तापर्यंत लाखोंची रक्कम जीएसटी अधिकारी म्हणून ठगण्यात आली या कारवाईत आरोपी सहित अवैध वसुलीसाठी वापरली जाणारी लाल दिव्याची गाडी जप्त करण्यात आली आहे. फिर्यादी कश्मीरसिंग सरदार हजारासिंग बाजवा यांनी दि. 04 जानेवारी रोजी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांविरुध्द आझादनगर पो स्टे धुळे येथे गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील अनोळखी 03 ते 04 नमुद आरोपीतांनी संगनमत करून लाल दिव्याची टाटा सुमो गाडीचा बापर करून फिर्यादी यांच्या मालाचा मालट्रक अडवुन ट्रक चालकास जीएसटी अधिकारी असल्याचे भासवून ट्रकमधील मालाच्या पावत्यांची पाहणी करून टैक्स इन्व्हाईस बिलात फर्मच्या नावात चुक असल्याचे सांगून फियांदी यांचेशी मोबाईल वरील व्हॉटसअॅप व्दारे संपर्क साधुन फिर्यादीकडून प्रथम 12,96,000/- रुपये दंडाची मागणी करून त्यानंतर तडजोडी अंती 1,30,000/- रुपये मोबाईल गुगल-पे व्दारे स्विकारुन फिर्यादी यांची फसवणुक केल्याचे फिर्यादीत नमूद होती मा. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सदर गुन्ह्याचा सखोल तपास करुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत मा.सहा. पोलीस अधीक्षक एस. ऋषीकेश रेड्डी सो व मा. पोलीस निरीक्षक बाळासाहेब थोरात यांना सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन आरोपीत यांनी वापरलेल्या गुन्हा करण्याच्या पध्दतीवरुन व तात्रिक विश्लेषणावरुन सदरचा गुन्हा उघडकीस आणून आरोपी (1) स्वाती रोशन पाटील रा. नाशिक (2) बिपीन आनंदा पाटील रा. धुळे (3) इम्रान ईसाक शेख रा.धुळे यांना निष्पन्न करुन नमुद गुन्हयाचा तपास करणे कामी दिनांक ३१ रोजी अटक करण्यात आलेली आहे. नमुद गुन्हयामध्ये अद्यापपावेतो फिर्यादी व इतर साक्षीदार यांची एकुण ७५,३३,९८४/- रुपयांची फसवणूक झाले असल्याचे निष्पन्न झालेले आहे. नमुद गुन्हयातील इतर निष्पन्न आरोपी हे फरार असुन त्यांचा शोध चालू आहे. तसेच आझादनगर पोलीस ठाण्याचे वतीने आवाहन करण्यात येते की, सदर गुन्ह्यातील आरोपीलांनी जी.एस. टी. अधिकारी असल्याचे भासवून ज्या व्यापाऱ्यांची फसवणूक झाली असेल अशा व्यापाऱ्यांनी आझादनगर पोलीस स्टेशन, धुळे येथे संपर्क साधावा असे आवाहन देखील करण्यात आले आहे.
नमूद कारवाई श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, धुळे, श्री.किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक सो, धुळे, श्री. एस ऋषीकेश रेड्डी, सहा. पोलीस अधीक्षक सो, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली आझादनगर पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी पो.नि.श्री. बाळासाहेब थोरात, सपोनि श्री. संदीप पाटील, सपोनि श्री. उमेश बोरसे, खालीदा सय्यद, योगेश शिरसाठ, शांतीलाल सोनवणे, संदीप कढरे, योगेश शिंदे, मुक्तार मन्सुरी, गौतम सपकाळे, मकसूद पठाण, अनिल शिंपी, पंकज जोंधळे, सचिन जगताप, सिध्दार्थ मोरे, धिरज काटकर, बंदना कासवे तसेच विशेष पथकातील दत्तात्रय उजे, किरण कोठावदे, महेंद्र भदाणे,निलेश पाकड यांचे पथकाने केली आहे.



# नागपूर येथील निरंकारी समागमामध्ये 45 जोडप्यांचे लग्न

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** निरंकारी सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता यांच्या पावन सानिध्यामध्ये सोमवार 29 जानेवारी रोजी नागपूरमध्ये 57 व्या निरंकारी समागमामध्ये सामूहिक विवाह समारोहाचे आयोजन केले होते. नवविवाहित वर वधूंना सद्गुरु माताजी ने गृहस्थ जीवनामध्ये भक्ती पूर्ण जीवन जगण्याचा आशीर्वाद प्रदान केला. भारताच्या सर्व राज्यातून एकूण 45 जोडपे सामील झाले होते.यातून खरोखरच समाजाला प्रेरणा देण्याचे काम सद्गुरु माताजीने केले.
आज जर समाजाची अवस्था बघितली तर लोक विवाह समारंभासाठी लाखो रुपये खर्च करत आहेत .मात्र निरंकारी समागमामध्ये निशुल्क विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. अनेकतेत एकतेचे मनोहर दर्शन या समाजामध्ये बघण्यास मिळाले आहे. निसंकोच एकदम साध्या पद्धतीने हा लग्न समारंभ पार पडला. जाती ,वर्ण ,धर्म ही सर्व विषमता मिटवून एकत्वाचा सुंदर संदेश यावेळी देण्यात आला. जो निरंकारी मिशनचा पण संदेश आहे. एकाला जाणा, एकाला माना आणि एक व्हा ...या महाराष्ट्राच्या संत समागमासाठी नागपूर येथे परभणी ,गंगाखेड, सेलू जिंतूर , येथून मोठ्या प्रमाणात भक्तमंडळी यांची उपस्थिती होती. परभणी जिल्ह्याचे संयोजक महात्मा परम आदरणीय रमेश जी चव्हाण यांनी सर्व संत महात्मा यांनी समागमाचा आनंद घेतला, त्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

# फुलेनगर बनले वरलीचे माहेरघर; नवीन ठाणेदारांसमोर जुने आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** रिसोड शहरातील महात्मा फुले नगर परिसरात अवैध धंदे वाल्यांनी अक्षरशः थैमान घातले असल्याचे दिसून येत आहे. अवैध धंदे करणाऱ्यांवर पोलिस विभागाची वदरहस्थ नसल्याचे दिसून येते. यामुळेच अवैध धंदे करणारे हे बिनधास्तपणे कोठे आपली दुकाने थाटून आपला खिसा गरम करत आहे. यामुळे आता नवीन ठाणेदारांसमोर जुने आव्हान असल्याचे दिसून येत आहे नवीन ठाणेदारांनी या परिसरात होत असलेली अवैध वरली मटका व अन्य अवैध व्यवसाय बंद करण्यात यावे अशी मागणी महात्मा फुले नगरवासी कडून केली जात आहे. आश्चर्याची बाब म्हणजे वरली मटका खेळत असताना काही महिला सुद्धा आढळून आल्या आहेत यामुळे सदर वरली मटक्याने अनेकांची संसारे उध्वस्त्याची मार्गावर असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.
एकीकडे रोजगार नसलेल्या सामान्य नागरिकांना आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सतावत असून कसेबसे आपला उदरनिर्वाह चालवत आहे. मात्र वरली, मटका, एक्का बादशहा वाल्यांनी अक्षरशः सामान्य गरिबांची लूट सुरू केली आहे. याकडे पोलीस प्रशासन जाणून-बुजून डोळेझाक करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. रिसोड येथील महात्मा फुले नगर परिसरात अवैध धंदेवाल्यांची अक्षरश थैमान घातल्यामुळे सामान्य नागरिकांची कुचंबना होत आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी जनतेकडून होत आहे.



# महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे पंढरपूर येथे तीन आणि चार फेब्रुवारी रोजी तिसरे अधिवेशन !

## सुधीर मुनगंटीवार, नंदकुमार गादेवार यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**
**जिंतुर :** महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या जिल्हा कार्यकारी मंडळाचे तिसरे अधिवेशन दिनांक 3 आणि 4 फेब्रुवारी रोजी पंढरपूर येथे भरविण्यात येणार आहे. या अधिवेशनासाठी वने सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री नामदार सुधीर मुनगंटीवार, हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार, निजामाबाद तेलंगण मतदार संघाचे आमदार धनपाल सूर्यनारायणा, आंध्र प्रदेश पर्यावरण व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष गुब्बा चंद्रशेखर, काशी अन्नसत्रम समितीचे सदस्य बच्चू विलास यांच्यासह आर्य वैश्य समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती स्वागताध्यक्ष महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासचिव गोविंदराव बिडवई यांनी दिली आहे.

महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा संपूर्ण महाराष्ट्र राज्यासह इतर राज्यातही प्रस्थापित झाली आहे. महासभेच्या वतीने विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. पहिले अधिवेशन शिर्डी या ठिकाणी झाले आणि दुसरे अधिवेशन तिरुपती येथे भरविण्यात आले. दोन्ही अधिवेशनाला समाज बांधवांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून आता तिसरे अधिवेशन श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दिनांक तीन व चार फेब्रुवारी 2024 रोजी भरविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यात महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे जिल्हा कार्यकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

अशा सर्व जिल्हा कार्यकारी मंडळ, महाराष्ट्र आर्य वैश्य महिला महासभेच्या सर्व जिल्हा कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची या अधिवेशनासाठी उपस्थिती राहणार आहे. समाजाचा सर्वांगीण विकास हेच राष्ट्र उन्नतीचे माध्यम आहे. या उद्देशाने समाज संघटन आणि बळकटी करण्यासाठी हे महत्त्वपूर्ण आयोजन आहे. या ऐतिहासिक व समाजाच्या कल्याणासाठी आयोजित केलेल्या अधिवेशनात सर्व समाज बांधवांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. हे मात्र विशेष. दोन दिवसीय अधिवेशनासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नामदार सुधीर मुनगंटीवार, कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून आमदार समीर कुणावार यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून निजामाबादचे आमदार धनपाल सूर्यनारायणा, गुब्बा चंद्रशेखर, विलास बच्चू, तिरूमला देवस्थानच्या माजी विश्वस्त सपनाताई मुनगंटीवार, अखिल भारतीय आर्य वैश्य महिला महासभेच्या अध्यक्षा माधुरीताई कोले, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, अमरावतीचे माजी आयुक्त प्रवीण आष्टीकर, बांधकाम समितीचे अध्यक्ष भानुदास वट्टमवार, कोषाध्यक्ष अनिल मनाठकर, महासभेच्या महिला अध्यक्षा सुलभाताई वट्टमवार, सचिव शिल्पाताई पारसवार, कोषाध्यक्षा राजश्री पारसवार यांच्यासह महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा राज्य कार्यकारिणी, बांधकाम समिती, सर्व जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी तसेच सर्व महिला जिल्हाध्यक्षा व महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती राहणार आहे.

या महासभेच्या अधिवेशनासाठी आर्य वैश्य समाजातील समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष तथा महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासचिव गोविंदराव बिडवई, कोषाध्यक्ष सुभाष कन्नावार, संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार, राज्य प्रसिद्धी प्रमुख नरेंद्र येरावार यांनी केले आहे.

दिनांक तीन आणि चार फेब्रुवारी रोजी दोन दिवस सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत अधिवेशन भरविण्यात येणार आहे. श्री यश पॅलेस, कराड रोड, पंथ नगरी शेजारी पंढरपूर येथे हे अधिवेशन भरविण्यात येणार आहे. दोन दिवसीय अधिवेशनासाठी संपूर्ण राज्यातून जवळपास एक ते दीड हजार समाज बांधव उपस्थित राहणार असल्याने त्याची जय्यत तयारी महासभेच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील व पंढरपूर येथील महासभेचे पदाधिकारी संजय कौलवार, अविनाश नलबिलवार, डॉ. सचिन लादे, राजेंद्र वट्टमवार, सुलभाताई वट्टमवार यांच्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील महासभेचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# व्हॉट्सअॅप स्टेटस ठेवत बँक व्यवस्थापकाची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** मित्रा माझी लाइफ खूप छान होती रे, माझ्या हत्येचे कारण तूच... असे स्टेटस व्हॉट्सअॅपवर ठेवत अॅक्सिस बँकेच्या सहायक व्यवस्थापकाने गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. विठ्ठल मधुकर सदार (वय २८, मूळ रा. खडकी सदार, रिसोड, वाशीम) असे या तरुणाचे नाव आहे. औरंगपुरा गुलमंडी या भागात हा प्रकार ३१ जानेवारीला सकाळी साडेदहा वाजता उघडकीस आला. विठ्ठलच्या माध्यमातून पुण्याच्या एका व्यक्तीने तलाठी भरतीसाठी विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांची रक्कम घेतली होती. या प्रकारात त्याची फसवणूक झाल्याने त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले. याप्रकरणी सिटी चौक पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार विठ्ठल हा आठ वर्षांपासून शहरात वास्तव्यास होता. धनमंडी, नारळीबाग भागात तो चार मित्रांसह एका फ्लॅटमध्ये राहत होता. अॅक्सिस बँकेत काम करीत असतानाच विठ्ठल स्पर्धा परीक्षेची तयारीदेखील करीत होता. ३१ जानेवारीला विठ्ठलने मोबाइल व्हॉट्सअॅपवर भावनिक स्टेटस सर्वांना सोडून जात असल्याचा उल्लेख केला. त्याच्या मित्रांनी हे स्टेटस पाहताच फ्लॅटकडे धाव घेतली. यावेळी फ्लॅटमध्ये एकट्या असलेल्या विठ्ठलने गळफास घेत आत्महत्या केल्याचे आढळून आले. मित्रांनी तातडीने सिटी चौक पोलिसांना ही माहिती दिली.



# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदी गजानन वायाळ यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्र मोरे**
**चिखली :** राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट ) पक्षाच्या बुलढाणा जिल्हा उपाध्यक्षपदी गजानन वायाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार राजेंद्र शिंगणे यांच्या मार्गदर्शनात सदर नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.



चिखली तालुक्यातील मेरा बु. येथील गजानन वायाळ यांचा जिल्हयात दांडगा जनसंपर्क आहे. तसेच तालुक्यातील अनेक ग्राम पंचायतीवर त्यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विकास कामांत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सामाजिक समस्या सोडविण्यासाठी वायाळ सदैव तत्पर असतात. म्हणून जिल्हयात त्यांचा खुप मोठा चाहता वर्ग आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी निश्चितच त्यांचा पक्षाला फायदा होईल त्या अनुषंगाने पक्षाचे जिल्हाध्यक्ष नाझेर काझी यांनी पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदाची धुरा त्यांच्यावर सोपविली आहे. त्यांची नियुक्ती झाल्याचे कळताच संपूर्ण तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# कबीर गंज येथे आ. फारुक शाह यांच्या हस्ते अभ्यासिकेचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील संपूर्ण रस्ते गटार व मूलभूत सोयी सुविधांसाठी आ.फारुख शाह हे प्रयत्न करीत असून त्याला आज पर्यंत यश आलेले आहे.तसेच शहराच्या विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी शहरात एकूण चार ठिकाणी अभ्यासिका होणार आहे शहरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांना तोंड देण्यासाठी व अभ्यास करून स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी हे अभ्यासिका महत्वपूर्ण भूमिका निभावणार आहे. धुळे शहरात एकूण चार ठिकाणी. महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना अंतर्गतअभ्यासिका होणार आहेत त्यात विटाभट्टी देवपूर ,साक्री रोड, कबीर गंज तसेच जिरेकर नगर येथे अभ्यासिका होणार आहे.मुस्लिम वसाहतींमध्ये लहान घरे,नादारीची परिस्थिती यामुळे मुलांची शैक्षणिक प्रगती खुंटते ही बाब लक्षात घेवून आ.फारुख शाह यांनी प्रभाग क्र.३ विटा भट्टी आणि कबीर गंज येथे अभ्यासिका प्रस्तावित केली होती. त्यापकी कबीर गंज सर्व्हे न.४०३ जुन्या हबिबी शाळे जवळ 25 लक्ष खर्चातून अभ्यासिका बांधणे या कामाच्या शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळीस नगरसेवक नासिर पठाण,नगरसेवक आमिर पठाण, डॉ.सरफराज अन्सारी,माजी नगरसेवक साजिद साई,डॉ. दीपश्री नाईक,इकबाल शाह,निजाम सैय्यद, हारूण खाटीक,आसिफ शाह,शाहिद शाह,सुलेमान मलिक, हालिम शमसुद्दिन, नाजीम शेख,एड. जुबेर अन्सारी,बबलू अन्सारी,लल्या अन्सारी,युनूस शेख,जावेद खाटीक,मुस्ताक शेख,रियाज शाह, सउद आलम,मुक्ती कमर,सलमान खान, अबरार शाह,मलेका खाटीक,अकेला ,आकीब अली शब्बीर अली, शादाब खाटीक,रिझवान अन्सारी, तौकिर रजा,फकिरा बागवान, अफसर शाह इंजिनियर,व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# मराठी भाषा म्हणजे काळाच्या ओघात स्वतःला बदलवून घेणारी भाषा आहे

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे मराठी भाषा संवर्धनानिमित्त कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. रामराव चव्हाण बोलत होते, मराठी ही समृद्ध आणि ज्ञानभाषा आहे,मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी व्यवहाराची भाषा होणे आवश्यक आहे. इंग्रजी, हिंदीचे प्राबल्य वाढत असताना मराठीने आपले वेगळेपण टिकवून ठेवले आहे. मराठी भाषेत दर्जेदार साहित्य निर्मिती होत आहे, मराठी चित्रपटसृष्टीत कथा,कविता, कादंबऱ्यांचे वेगळेपण दिसून येत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. बाळासाहेब सोनवणे यांनी केले, ते पुढे बोलताना म्हणाले की मराठी भाषेत विश्वाचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे. संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामा पर्यंतची साहित्य निर्मिती समाज प्रबोधन करणारी आहे. संत साहित्यामुळे अधोगतीला चाललेला समाज सन्मार्गावर येऊ शकेल. संत साहित्याचा सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमामध्ये समावेश होणे काळाची गरज आहे. प्रा. डॉ. विष्णू सुराशे यांच्या काव्यातून मानवी जीवनातील विसंगती व उपहासाचे वर्णन दिसून आले, तर सुंदर माझी शाळा फेम गणेश घुले यांनी शेतकरी बापाचे दुःख व्यक्त करणाऱ्या रचना सादर केल्या. धम्मपाल जाधव यांनी आजची तरुणाई मोबाईल मुळे कशी बिघडत चालली आहे अशा आशयाच्या रचना सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. ऋषीबाबा शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. उदय पवार यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मृतावस्थेत आढळला वाघाचा बछडा

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**
**यवतमाळ :** जिल्ह्यातील वणी तालुक्यातील सुकनेगाव शिवारात असलेल्या तलावाजवळ वाघाचा बछडा मृतावस्थेत आढळला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वणी तालुक्यात कोळसा खाणी तसेच जंगल परीसरात वाघाचा वावर असल्याचे यापूर्वी स्पष्ट झाले आहे. यामुळे येथील शेतकरी वाघाच्या दहशतीत वावरत होते. यापूर्वी वाघाने जनावर तसेच शेतमजुरावर हल्ला चढविल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. आता सुकनेगाव येथील तलावाजवळ तीन महिन्यांचा वाघाचा बछडा नागरीकांना



मृतावस्थेत आढळुन आला. नागरिकांनी तात्काळ याची माहिती वनविभागाला दिली. वनपरीक्षेत्रीय अधिकारी प्रभाकर सोनडवले यांनी पथकासह तातडीने घटनास्थळ गाठले. त्यावेळी सुकनेगाव बिटमध्ये महसुल विभागाच्या कक्ष क्रमांक 6 पासून 20 ते 30 मीटर अंतरावरील तलावाजवळ वाघाचा बछडा मृतावस्थेत पडलेला होता. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर मंदर येथील निलगीरी वनात वाघाच्या मृत बछड्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

हिवराळे क्लिनिक
अॅण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
अॅक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व अॅलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# हळदी-कुंकू कार्यक्रमातून सावित्रीबाईंच्या कार्याचा जागर

## वडूज येथील 'जाऊबाई जोरात' या ग्रुपकडून देखावा सादर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** स्त्री शिक्षणाचे उद्धारक क्रांतिसूर्य ज्योतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा जागर करणाऱ्या एका अनोख्या उपक्रमाचे आयोजन वडूज, ता.खटाव येथील "जाऊबाई जोरात"या ग्रुपच्या माध्यमातून करण्यात आले होते.विशेष म्हणजे हा उपक्रम हळदी कुंकू आणि तीळगूळ वाटपाच्या अनुषंगाने घेण्यात आला होता.यावेळी आठशे हून अधिक महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.शिवाय या कार्यक्रम प्रसंगी आलेल्या सर्व महिलांना वही पेन देत एक ज्ञानरुपी शिक्षणाचा संदेश देण्यात आला."जाऊबाई जोरात" हा ग्रुप माळी कुटूंबातील १९ जावांनी एकत्र येत बनविलेला ग्रुप असून या ग्रुपच्या माध्यमातून विविध उपक्रम हाती घेतले जात असतात.यावर्षी हळदी कुंकू आणि तिळगूळ वाटप कार्यक्रमाच्या निमित्ताने फुले दांपत्याच्या कार्याला काही देखाव्याच्या माध्यमातून सादरीकरण करण्याची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत आणली.

सणांचे निमित्त साधत आपल्या आदर्शांच्या कार्याचे स्मरण करणाऱ्या या उपक्रमाचे व जाऊबाई जोरात या ग्रुपचे विशेष कौतुक होऊ लागले आहे.

महिलांचा हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न होत असताना यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून आमदार जयकुमार गोरे यांची पत्नी सोनिया गोरे उपस्थित होत्या.तसेच भारती गोरे,डॉ.वसुधा कर्णे,माजी नगराध्यक्षा शोभा माळी,नगरसेविका रेखा माळी, डॉ.नारायण बनसोडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.प्रमुख वक्ते म्हणून डॉ.नारायण बनसोडे यांनी महिलांना फुले दांपत्याच्या कार्याचे मार्गदर्शन केले. डॉ.नारायण बनसोडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील त्या तिळगुळ कार्यक्रमाबद्दल बोलताना म्हटले की,१८५२ मध्ये सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी तिळगुळ कार्यक्रम पुण्यात साजरा केला होता.या कार्यक्रमाला तत्कालीन कलेक्टर मिसेस जोन्स व मिसेस मिचेल अध्यक्षस्थानी होत्या.सर्व जाती धर्मातील महिलांना एकाच मंचावर बसविले होते.यावेळी त्यांनी फुले दांपत्याच्या कार्यावर विशेष प्रकाशझोत टाकताना फुले दांपत्याच्या संघर्षाची आठवण डॉ.नारायण बनसोडे यांनी करून दिली. कार्यक्रम प्रसंगी जोतीराव फुले आणि सावित्री फुले यांना पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले.



सावित्रीबाई फुले ह्या मुलींना शिकविण्यास जात असताना कर्मटकांकडून कशा पद्धतीने दगड व शेण त्यांच्यावर फेकले जायचे हे या देखाव्या सह मुलींना शिकवितानाचा देखावा सुद्धा मांडण्यात आला होता. तसेच पहिला सत्यशोधक विवाह सोहळा,सर्वांसाठी खुला केलेला पाण्याचा हौद आदी देखावे सुद्धा साकारण्यात आले.फुले दांपत्य यांचे चित्र साकारण्यात आले होते.तसेच बाजूला क्रांतिज्योती बद्दल काव्य सुद्धा लिहिण्यात आले होते.हे सर्व पाहून आलेल्या महिलांनी सुध्दा या महत्वपूर्ण उपक्रमाचे विशेष कौतुक केले.हे

सगळे नियोजन व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोनिका माळी,कल्याणी माळी,पुनम माळी, अनुप्रिता माळी,विद्या माळी,संध्या माळी,श्रध्दा माळी,रुपाली माळी, वृषाली माळी,शोभा माळी, शीतल माळी,सारिका माळी,वैशाली माळी,भारती माळी,वनिता माळी,रेखा माळी आदी सर्व जाऊबाईंनी खूप मेहनत घेतली.या कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्व मान्यवर आणि महिलावर्गाचे आभार "जाऊबाई जोरात" या ग्रुपकडून मानण्यात आले.उपक्रमाच्या अनुषंगाने विविध देखाव्यातून फुले दांपत्याचे कार्य मांडता आले.याबद्दल "जाऊबाई जोरात" या ग्रुपने विशेष समाधान सुद्धा व्यक्त केले.

# बसची मालमोटारीला धडक; १० जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** जिल्ह्यातील कोंडाईबारी घाटात बुधवारी सकाळी नवापूर- पुणे बसची मालमोटारीला मागून धडक बसल्याने १० प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना जवळच्या दहिवेल आणि विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.नंदुरबार जिल्ह्यातून जाणारा नागपूर-सुरत राष्ट्रीय महामार्ग मृत्युचा सापळा झाला असून दररोज लहानमोठे अपघात या महामार्गावर होत आहेत. बुधवारी सकाळी साडे दहा वाजता नवापूर आगारातून पुण्यासाठी निघालेली बस साडे अकराच्या सुमारास कोंडाईबारी घाटात आली असता पुढे चालणाऱ्या मालमोटारीला बस मागून धडकली. या अपघातात बसच्या चालक कक्षाचे अधिक नुकसान झाले.

या अपघातात बसमधील १० प्रवासी जखमी झाले असून जखमींचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. अपघाताची माहिती मिळताच विसरवाडी आणि महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

स्थानिकांच्या मदतीने त्यांनी जखमींना दहिवेल आणि विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. संथपणे सुरु असलेले महामार्ग चौपदरीकरणाचे काम अपघातांसाठी कारण ठरत असल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे. चौपदरीकरणाच्या कामामुळे वाहनांना अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे हे काम त्वरीत पूर्ण करण्याची आवश्यकता मांडण्यात येत आहे.

# एनईपी २०२०: स्कूल कनेक्ट व्याख्यानाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै.रमेश वरपूडकर कला, वाणिज्य आणि विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत स्कूल कनेक्ट अभियान राबविण्यात आले. याचा सविस्तर वृतांत असा की; महाराष्ट्र शासनाच्या ५ जानेवारी २०२४ च्या आदेशान्वये प्रत्येक विद्यापीठाने आपल्या परिक्षेत्रातील महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या सहाय्याने एक अथवा अधिक प्राध्यापक साधन व्यक्तीने (रिसोर्स पर्सन) तालुक्यातील प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन पुढील वर्षापासून लागू होणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची माहिती द्यावी असे सुचवले होते. या अनुषंगाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यात नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत स्कूल कनेक्ट अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. सोनपेठ येथील कै.रमेश वरपूडकर वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने सोनपेठ तालुक्यातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयात दिनांक ३० आणि ३१ जानेवारी या दोन दिवसात हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले. यामध्ये कै.रमेश वरपूडकर कनिष्ठ महाविद्यालय सोनपेठ येथे प्राचार्य डॉ.व्ही.डी. सातपुते, प्राचार्या शेख शकीला, समन्वयक प्रा. डॉ.एम.बी.पाटील यांच्या उपस्थितीत साधन व्यक्ती प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी विद्यार्थी-शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरण २०२० संबंधाने विस्तृत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आरती बोबडे यांनी तर आभार प्रा.सुरेश मोरे यांनी मानले. तसेच जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, सोनपेठ, व्हिजन कनिष्ठ महाविद्यालय, सोनपेठ येथे प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी विद्यार्थी-शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरण २०२० संबंधाने विस्तृत मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमासाठी तीनही महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# अनुवाद ही ज्ञानसाहित्य सर्वांपर्यंत पोहचवण्याची कला : प्रा. डॉ. कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** प्राचीन काळातील वेद, पाणिनी, भारत नाट्यशास्त्र, पतंजली बौद्ध, शीख कालीन भारतीय ज्ञान साहित्य, परंपरा हि गौरवशाली, वैभवशाली, वैज्ञानिक, प्रभावी, प्रतिभासंपन्न असून त्याचा आपल्या शिक्षणव्यवस्थेत आत्तापर्यंत समावेश केलेला दिसून येत नाही. भारतीय परंपरेचा स्वीकार न करता पाश्चात्य संकृतीचा प्रभाव शिक्षणव्यवस्थेत जास्त दिसून आला आणि तीच चिंतनीय बाब आहे आणि अनुवाद हे एक प्राचीन ज्ञान परंपरा सर्वांपर्यंत पोहचवायचे एक माध्यम आहे असे मत नवी दिल्ली शिक्षा मंत्रालय भारत सरकार व केंद्रीय हिंदी संस्थान आगरा एवं केंद्रीय हिंदी निदेशालयाचे निदेशक प्रो. डॉ. सुनील कुलकर्णी यांनी मांडले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरा, भारतीय भाषा, प्रादेशिक भाषेत शिक्षण घेणे अनिवार्य केले आहे हि महत्वाची बाब असल्याचे नमूद केले. ते न्यू आर्टस् महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई आणि न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय ज्ञान परंपरा और अनुवाद" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय संगोष्टीच्या आयोजनात बोलत होते. महाराष्ट्र हिंदी साहित्य अकादमी ने या संगोष्टीसाठी एक लाख रुपय अनुदान महाविद्यालयास दिले. या प्रसंगी मुंबई येथील महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष शीतला प्रकाश दुबे यांनी आधुनिकता आणि परंपरा यांच्यातील सांगड कशी घालावी लागते याबद्दल मार्गदर्शन केले. अनुवाद करण्यासाठी पहिले आपली परंपरा समजून घेऊनच अनुवाद करायला हवा असे मत डॉ दुबे यांनी मांडले. या संगोष्टीचे बीजभाषण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो. डॉ. सदानंद भोसले भारतीय समाजिक शास्त्र आणि भौगोलिक शास्त्रातील ज्ञान परंपरा सांगून उपनिषदामधील संवाद कौशल्याचा प्रभाव आणि संवाद हे मातृभाषेत प्रभावीपणे होऊ शकतात त्यामुळे या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये मातृभाषेत शिक्षण सर्वांना मिळणार आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# पथदिवे कधी प्रकाशमान होतील ?

## भोकर पालिकेचा कानाडोळा : मुख्य रस्ते अंधारात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील चार वर्षांपासून येथील नगर पालीकेच्या निवडणूका ठप्प झाल्याने प्रशासकाच्या भरवशावर कारभार सुरू आहे. शहरातील बहुतांशी विकास कामांना खीळ बसली आहे. मुख्य रस्त्यावर असलेले पथदिवे बंद असुन अंधारातच नागरीकाना वाटा धुंडाळाव्या लागत आहेत. कधी एकदा पथदिवे प्रकाशमान होतील अशी त्रस्त झालेल्या नागरिकांना प्रतिक्षा करावी लागत आहे. प्रशासकाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

प्रारंभी ग्रामपंचायत कार्यालया अंतर्गत कारभार सुरू होता.मराठवाड्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून अकलूज प्रथम



तर भोकर क्रमांक दोन अशी ओळख होती. त्यावेळी लोकसंख्या कमी असल्याने कारभार सूरळीत होता कालांतराने लोकसंख्या वाढल्यामुळे निधीची कमतरता भासू लागली आणि विकासकांना अडणचणी निर्माण झाल्या.ग्रामपच़ायत बरखास्त करून नगर पालिका करण्यात यावी अशी मागणी जोर धरू लागली.आखेर मागील पंधरा वर्षांपूर्वी पालीका अस्तित्वात आली अन् विकासाला चालना मिळाली.योगायोगाने माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी या भागाचे नेतृत्व करीत असल्याने" चार चाँद लागले आहेत." प्रारंभी पासुन पालीकेवर काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता आहे.दरम्यान पालीकेत बराच " गोंधळ " झाला आणि नागरीकानी तो सहन हि केला. सध्या मागील चार वर्षांपासून निवडणुका ठप्प झाल्याने प्रशासकाकडे जबाबदारी देण्यात आली आहे.प्रशासक फारस मनावर घेत नसल्याने पुन्हा कारभार ढेपाळला आहे. अनेक लोकाभिमुख कामांना खीळ बसला आहे. शहरातील मूख्य रस्त्याच्या दूभाजकात प्रारंभी पथदिवे बसविण्यात आले असून एका खासगी कंत्राटदारानी अंदाज पत्रकाला बगल देऊन हलक्या प्रतीचे साहित्य वापरून "चांदी" करून घेतली.वीजेची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदारास काम दिले होते. सध्या हे काम पालीकाच पाहते आहे.मागील अनेक दिवसांपासून शहरातील बरीच पथदिवे बंद असुन मोजक्याच ठिकाणी प्रकाशाची झगमगाट आहे. पथदिव्या खालील अंधार कधी नाहीसा होईल याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.प्रशासक अधिकारी याबाबींकडे जाणीव पूर्वक कानाडोळा करीत असल्याने नागरीकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# पोलीस अधिकारी अंकित गोयल यांच्याकडे पुन्हा गडचिरोलीची धुरा

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** सव्वा वर्षांपूर्वी गडचिरोलीतून पुण्याला गेलेले पोलीस अधिकारी अंकित गोयल यांना बढती देत पुन्हा गडचिरोलीची जबाबदारी देण्यात आल्याने नक्षलवाद्यांची चिंता वाढली आहे. त्यांनी आपल्या गडचिरोली पोलीस अधीक्षक पदाच्या कार्यकाळात राबवलेल्या आक्रमक नक्षलविरोधी अभियानात मिलिंद तेलतुंबडे सारख्या मोठ्या नक्षलनेत्यासह तब्बल ५५ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आले होते. त्यामुळेच त्यांच्यावर गडचिरोलीच्या पोलीस उपमहानिरीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आल्याचे बोलल्या जात आहे. राज्य पोलीस दलात बुधवारी झालेल्या खांदेपालटानंतर अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. यात पुण्याचे पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांना बढती देत गडचिरोलीचे पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. २०१९ मध्ये कुरखेडा तालुक्यातील जांभुळखेडा मार्गावर नक्षल्यांनी घडवून आणलेल्या भूसुरुंगस्फोटात १५ पोलीस जवान शहीद झाले होते.



# एसएलपी ईगल संघास सीएमए टीसीपीएल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या औरंगाबाद चॅप्टरतर्फे विद्यार्थी व सभासदांसाठी 'सीएमए टीसीपीएल -२०२४' ही क्रिकेट स्पर्धा बॅकवूड्स अरेना, ई -४७ , कलाग्रामसमोर, एम.आय.डी.सी चिकलठाणा येथे अतिशय उत्साहात पार पडली. सीएमए सलमान पठाण यांच्या नेतृत्वाखालील एसएलपी ईगल संघाने स्पर्धेचे विजेतेपद मिळवले तर सीएमए श्रेयस खोंडे यांच्या नेतृत्वाखालील सीएमए बाय सीएमए संघाने उपविजेतेपद मिळवले.

स्पर्धेचे उद्घाटन पोलिस उपायुक्त नितिन बगाटे यांच्या हस्ते झाले. आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष सीएमए चैतन्य मोहरीर, औरंगाबाद चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए राजेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. सीएमए चैताली पाठक यांनी सूत्रसंचालन केले. एकूण १४ संघाचा सहभाग या स्पर्धेत सर्व सामने चुरशीचे झाले. अंतिम सामन्यात सीएमए सलमान पठाण यांच्या नेतृत्वात एसएलपी ईगल संघाने स्पर्धेचे विजेतेपद मिळवले तर सीएमए श्रेयस खोंडे यांच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या सीएमए बाय सीएमए संघाने उपविजेतेपद मिळवले. आदित्य चोबे आणि तौसिफ पटेल यांच्या आक्रमक फटकेबाजीने उपस्थितांचे लक्ष वेधले. प्रमोद भोसले आणि परेश जोहर यांनी पंचांची भूमिका पार पडली तर धावफलकाची जबाबदारी अब्दुल कादर शेख आणि नितीन वडजे यांनी पार पाडली. चॅप्टरचे उपाध्यक्ष सीएमए सलमान पठाण ,सचिव सीएमए बाबासाहेब शिंदे,कार्यकारिणी सदस्य सीएमए विवेक देशपांडे, सीएमए संवेदी राणे आणि सीएमए श्रेयस खोंडे यांनी ओघवत्या शैलीत सामन्यांचे धावते समालोचन केले. स्पर्धेचे बक्षीस वितरण मेटरॉल इस्पातचे कार्यकारी अधिकारी सीएमए नितीन बाहेती, आयकॉन इंडस्ट्रीजचे कार्यकारी अधिकारी फारुक शेख, मंगलमूर्ती हेल्थकेअरचे जोशी, औरंगाबाद चॅप्टरचे कार्यकारिणी सदस्य सीएमए पराग राणे, सीएमए किरण कुलकर्णी, ज्येष्ठ सदस्य सीएमए सुरेश पिंपळे यांच्या हस्ते पार पडले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाची जबाबदारी चॅप्टरचे उपाध्यक्ष सीएमए सलमान पठाण , सचिव सीएमए बाबासाहेब शिंदे, कार्यकारिणी सदस्य सीएमए विवेक देशपांडे, सीएमए शैलेंद्रसिंग राजपूत यांनी पार पडली. चॅप्टरचे उपाध्यक्ष सीएमए सलमान पठाण यांनी आभारप्रदर्शन केले. या प्रसंगी चॅप्टरचे खजिनदार सीएमए प्रवीण मोहानी, सीएमए अश्विनीकुमार गुप्ता, सीएमए अभिषेक भालेराव यांची उपस्थिती होती.

# तंटामुक्त समित्यांना सोयगाव तालुक्यात कर्तव्याचा पडला विसर : प्रा. मदन डोखळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात गाव, बाडी, बस्ती, तांड्यावर खऱ्या अथनि शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गावातील भांडण तंटे गावातच मिटवण्यासाठी गावोगावी तंटामुक्त गाब समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. मात्र, चहुतांश गावातील तंटे मिटविण्यासाठी तंटामुक्ती समिती अध्यक्ष आणि सदस्यांकडून ठोस पाऊले उचलण्यात येत नसल्यामुळे, तंट्यातील दोन्ही पक्ष पोलिस स्टेशनच्या पायऱ्या चढत असल्याचे वास्तव चित्र दिसत असल्याचे माहिती प्रा मदन भाऊ डोखळे सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना दिली आहे.वाढती लोकसंख्या लक्षात घेता त्या तुलनेत प्रत्येक पोलिस ठाण्यात पोलिस अधिकारी, कर्मचारी यांची संख्या अपुरी आहे. शांतता व सुरक्षितता अबाधित ठेवताना नेहमीच पोलिस प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागते. हे लक्षात घेऊन त्या अनुषंगाने, राज्यांचे तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांनी गावातील तटे गावातच मिटावेत यासाठी १५ ऑगस्ट २००७ साली या योजनेची सुरुवात केली होती. तंटामुक्त गाव मोहिमेतील सर्व निकष पूर्ण करणाऱ्या गावांना विशेष बक्षिस रूपाने गाव विकासासाठी रक्कम दिली जात होती शिवाय तंटामुक्त समितीच्या कामकाजासाठी विशेष खर्चाची तरतूद सुद्धा केली जात होती. सध्या, या योजनेची अंमलबजावणी कशी होत आहे, याची माहिती देखील उपलब्ध होणे कठीण झाले आहे. शांततेकडून समृद्धीकडे जाण्याची बाट हेच उद्दिष्ट गाव तंटामुक्त होण्यासाठी शासनाने ठेवले आहे. तंटामुक्त गाव समिती कशी असावी, समितीचा अध्यक्ष व इतर सदस्यांमध्ये कशा व्यक्तींचा समावेश असावा याबाबतचे निकष राज्य शासनाकडून निश्चित करण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र काही गावे वगळता बहुतांश गावांमध्ये हे निकष डावलण्यात आल्याचे समजते. अनेक ठिकाणी राजकीय नेत्यांनी आपल्या मर्जीतील आणि कायद्याचे ज्ञान नसलेल्या व्यक्तींचा समावेश करून समित्या स्थापन केल्याची ओरड आहे. काही गावात स्वतःच मद्यपान करून वाद घालणारे अध्यक्ष तसेच सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अशा समितीकडून तंटे कसे मि टणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. बहुतांश समित्या निव्वळ नाममात्र कार्यरत असून, तंटा मिटविण्यासाठी अनेक गावातील समितीच्या अध्यक्षावरच ग्रामस्थांकडून केला. जात आहे. त्यामुळे " तंटामुक्त समितीची कर्तव्ये कोणती अन् ते भूमिका काय घेताहेत, यातील विसंगतीने अनेक गावचे ग्रामस्थ नाराज आहेत. अनेक गावांमध्ये हातभट्टीची दारू, गावातील अवैध धंदे बंद व्हावेत, गुन्हेगारी नियंत्रणात यावी, तसेच शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी निष्क्रिय असलेल्या तंटामुक्त गाव समित्यांची फेररचना करावी, अध्यक्षांची फेरनिवड करावी, अशी मागणी तालुक्यातील अनेक गावांमध्ये केली जात आहे. यासाठी प्रशासकीय यंत्रणेचा आळस आणि उदासीन कारभारही तेवढाच जबाबदार असल्याचे, नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे सोयगाव तालुक्यातील अनेक गावांतील या समित्या आज रोजी तरी केवळ कागदावरच शिल्लक आहेत. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन देत ही चळवळ सक्रीय करणे आवश्यक आहे. यासाठी महसूल आणि पोलिस यंत्रणेने पुढाकार घेणे गरजेचे झाले आहे.अशी माहिती प्रा मदन भाऊ डोखळे सामाजिक कार्यकर्ते डाभा यांनी सांगितले.



# चक्रधर शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औसा :** औसा शहरातील नवजीवन सेवाभावी संस्था द्वारा संचलित चक्रधर प्राथमिक व माध्यमिक या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले असून यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख होते तर कार्यक्रम अध्यक्ष म्हणून कॉग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरभैय्या खानापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या प्रसंगी युवक काँग्रेस लातूर जिल्हा उपाध्यक्ष हणमंत भैय्या राचट्टे, माजी नगराध्यक्ष जावेदजी शेख, माजी नगरसेवक गोपाळजी धानूरे, युवा उद्योजक इम्रान सय्यद, कृ. उ. बा. समिती संचालक विकासजी नरहरे, माजी नगरसेविका सौ. मंजुषाताई कसबे, कार्याध्यक्ष तालुका काँग्रेस)

प्रशांतजी भोसले, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शहेबाज उस्मानी, संस्थापक सचिव शब्बीरजी शेख यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे संस्थेतर्फे विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, यात यावर्षीचा आदर्श शिक्षक म्हणून मुल्ला रौफ सिकंदर, धानुरे आशिष विश्वंभर यांना तर आदर्श पालक म्हणून, पटेल अखलाख सालार व सातपुते महादेव यांना प्रदान करण्यात आला. तसेच आदर्श विद्यार्थी म्हणून कु. शिंदे ब्रह्मानंद व्यंकट, कु. करपुडे इसमाईल अजीम, कु.पवार अदिती दयानंद, कु.शेख अदनान गणी या विध्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते शॉल,सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



# बाजार समितीत कापूस खरेदी केंद्र मंजूर

## आ. डॉ. शिंगणे यांच्या प्रयत्नाने हमीभावात खरेदी सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला अपेक्षित भाव मिळावा म्हणून हमीभावाने सीसीआय खरेदी केंद्र मंजूर झाले असून आज (ता.३०) बाजार समिती यार्डात सभापती समाधान शिंगणे यांच्या हस्ते खरेदीला सुरुवात झाली. यासाठी कॉटन कॉर्पोरेशन कडे माजी मंत्री,आ.डॉ.राजेंद्र शिंदे यांनी पाठपुरावा केला होता.

बाजार समिती यार्डात कापूस खरेदी उद्घाटन प्रसंगी बायगाव येथील शेतकरी भास्कर आघाव यांचा शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. सभापती समाधान भिकाजी शिंगणे यांनी काटा पूजन करून विक्रीसाठी आणलेला कापसाला ७०२०/-भाव देण्यात आला. सी.सी आय चे ग्रेडर श्री.डहाके यांनी ओलावा तपासून शेतकऱ्यांचे ऑनलाईन नोंदणी केली व त्यानंतर कापूस खरेदीला सुरुवात करण्यात आली. देऊळगावमही मध्ये आठवडाभर रविवार वगळता कापूस खरेदी करण्यात येणार असून कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावानी कापूस विक्रीसाठी अद्यावत ७/१२ उतारा त्यामध्ये कापूस पिकाची नोंद असणे आवश्यक असून आधार कार्ड तसेच मूळ कापूस उत्पादक शेतकरी विक्रीसाठी उपस्थित असणे आवश्यक आहे कापूस खरेदी खरेदी उद्घाटनासाठी बाजार समितीचे संचालक मंडळ देऊळगांव मही मधील प्रगतशील शेतकरी माजी सरपंच अंनता इंगळे, भारत शिंगणे, श्रीकृष्ण शिंगणे,संजू माऊली शिंगणे,कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव किशोर म्हस्के व कर्मचारी वर्ग उपस्थित होते शेतकरी बांधवांनी कापूस खरेदी केंद्रावर कापूस विक्रीसाठी आणावा त्यासाठी चांगल्या प्रतीचा कापूस आणावा भिजलेला कापूस आणू नये तसेच ऑनलाईन नोंदणीसाठी ७/१२ उतारा त्यामध्ये कापूस पिकाची नोंद आधार कार्ड सोबत आणावे असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती समाधान भिकाजी शिंगणे व संचालक मंडळाने केले आहे.

# कंडारी ग्रामसभेत राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल अभिनंदनाचा ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार मिळवून गावाचे व शाळेचे नाव डॉ. जगदीश पाटील यांनी राज्यपातळीवर झळकविले आहे. त्याबद्दल जळगाव तालुक्यातील कंडारी येथील ग्रा.पं. कार्यालयात प्रजासत्ताकदिनी आयोजित ग्रामसभेत त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करून ग्रामगौरव करण्यात आला.

ग्रामसभेचे अध्यक्ष सरपंच सौ. यशोदाताई सोनवणे तर सचिव जि.प. शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक तुषार लोहार होते. उपसरपंच प्रकाश पाटील यांनी अभिनंदन ठरावाचे वाचन केले. ठरावात नमूद करण्यात आले आहे की, कंडारी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील पदवीधर शिक्षक डॉ. जगदीश पाटील सर यांना मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार मिळाल्याने कंडारी गाव व जिल्हा परिषद शाळेचे नाव राज्यपातळीवर झळकले आहे. कंडारी गावासाठी व शाळेसाठी ही आनंदाची व अभिमानाची बाब आहे. त्याबद्दल डॉ. जगदीश पाटील सर यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात येत आहे. ग्रामसभेत प्रोसिडींगवर लेखी घेऊन हा ठराव करण्यात आला. ठरावासाठी सूचक सौ. मनोरमाताई पाटील तर अनुमोदक मल्हारराव देशमुख होते. त्यानंतर सरपंच सौ. यशोदाताई सोनवणे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन डॉ. जगदीश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जळगाव पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. मनोरमाताई पाटील, कंडारी जि.प. शाळेचे मुख्याध्यापक तुषार लोहार, शिक्षक संतोष वानखेडे, कंडारी उपसरपंच प्रकाश पाटील, ग्रा.पं. सदस्य मल्हारराव देशमुख, समाबाई पिंजारी, लताबाई जाधव, अविनाश सोनवणे, सुरेखाबाई देशमुख, कृष्णा भील, अरूणा धनगर, सुनील सुर्वे यांच्यासह ग्रा.पं. कर्मचारी गोपाल रिवाजकर, श्याम निकम, प्रवीण सुर्वे तसेच ग्रामस्थ बाळू धनगर, सीताराम पाटील, प्रकाश सोनवणे, किसन परदेशी, नाना सोनवणे, सुधीर सुर्वे, राजू सोनवणे, रूपचंद सोनवणे, ज्ञानेश्वर वानखेडे, कैलास परदेशी आदी उपस्थित होते.





# अंबिकानगरच्या विद्यार्थ्यांशी शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी साधला संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** जिल्हा परिषद शाळा अंबिका नगर तालुका उत्तर सोलापूर येथील शाळेस जिल्हा परिषद सोलापूर प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती तृप्ती अंधारे मॅडम यांनी भेट दिली. त्यांची ही भेट प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणुन पदभार स्वीकारला त्यानंतर लगेच पहिली भेट होती. या भेटीत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सोबत मनसोक्त गप्पा मारत संवाद साधला. विद्यार्थ्यांना त्यांनी अनेक प्रश्न विचारले.

विद्यार्थ्यानी त्यांच्या प्रश्नांना छान उत्तरे दिली. विद्यार्थीही त्यांना प्रश्न विचारले. शाळेत सुरू असलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान बाबत त्यांनी विचारले असता विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या मदतीने शाळा कशी सुंदर झाली हे विद्यार्थ्यानी सांगितले. स्वच्छता मॉनिटर बाबत त्यांनी माहिती विचारली विद्यार्थ्यांनी स्वच्छता मॉनिटरचे काम कशाप्रकारे सुरू आहे हे सांगितले. महा वाचन अभियान या उपक्रमाबाबत वाचनाविषयी काय काय सुरू आहे हेही विद्यार्थ्यांनी सांगितले. तसेच परीक्षा पे चर्चा या पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रम विषयी विद्यार्थ्यांना विचारले असता विद्यार्थ्यांनी भरभरून उत्तरे दिली.पंतप्रधानांच्या भाषणातील कोणता भाग आवडला हे अनेक विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडीनुसार सांगितले. आपल्याला काय बनायचं आहे याविषयी विचारले असता मोठे होऊन वेगवेगळ्या क्षेत्रात काम करून देशाची सेवा करायची आहे असे विद्यार्थ्यांनी उत्तर दिले. शिक्षण घेताना उत्तम विद्यार्थी राहणे हेही एक प्रकारचे देशसेवा आहे असे शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. एकूणच शिक्षक विद्यार्थी पालक यांच्यातील आंतरक्रिया कशी आहे हे या संवाद सत्रातून शिक्षणाधिकारी यांच्या लक्षात आले. त्याबद्दल त्यांनी शाळेतील विद्यार्थी शिक्षक सर्वांचे मनापासून अभिनंदन केले.

विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी शाळेत सुरू असलेल्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. संवाद साधताना उत्तम सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांनी केला. यावेळी जिल्हा मुख्यालयातील शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती स्वाती स्वामी मॅडम व श्रीमती गोदावरी राठोड मॅडम उपस्थित होत्या. प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक सिद्धाराम माशाळे यांनी प्रास्ताविक केले आणि शाळेत चालू असलेल्या उपक्रमांची माहिती सांगितली. शाळेच्या वतीने शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे मॅडम यांचा सत्कार करण्यात आला. शाळेतील शिक्षिका श्रीमती रंजना काटकर, श्रीमती वैशाली गोंदकर, श्रीमती तेजश्री, श्रीमती रसिका बंदीछोडे, शिक्षक श्री शिवशंकर राठोड शिवाजी वडते यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे मॅडम यांनी शाळा प्रथम क्रमांक पटकावून नावारूपाला यावी यासाठी शुभेच्छा दिल्या.

# फुलंब्री पंचायत समिती कर्मचारी हरणे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पंचायत समिती फुलंब्री येथे मग्रारोहयो विभातात कार्यरत कर्मचारी अशोक हरणे हे ३१ जानेवारी रोजी नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत,त्यानिमित्त पंचायत समिती फुलंब्री सभागृहात गट विकास अधिकारी विनायक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश पवार विस्तार अधिकारी (कृषी) यांचे अध्यक्षतेखाली श्री. हरणे यांचा सपत्नीक सेवानिवृत्ती गौरव सोहळा संपन्न झाला. पंचायत समिती फुलंब्री येथे मग्रारोहयो विभातात कार्यरत कर्मचारी अशोक हरणे हे ३१ जानेवारी रोजी अशोक हरणे यांना सपत्नीक कपडे, साडी, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन पुढील आयुष्यात सुख,शांती,समाधान, आनंदी, निरोगी तसेच दीर्घायुष्य लाभो या शुभेच्छा सह भावपुर्ण वातावरणात अनेकांनी त्यांच्या बाबतीत आपले मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाची भूमिका पार पाडणारे श्री.अनिल दादा पवार साहेब,श्री.निकम साहेब, श्री.सुवर्णकार साहेब,श्री. कदम साहेब, श्री.कुलकर्णी साहेब, श्री.खोडपे साहेब,श्री. यंबडवार साहेब, श्री.पांडे साहेब,श्री.रवी निकम साहेब,श्री.केदारे साहेब,श्री.पिंगळे साहेब, श्री.साखरे मामा, श्री.सावंत साहेब,श्री. चव्हाण साहेब,श्री.वखरे साहेब, श्रीमती.कानडे मॅडम,श्रीमती. उभाळे मॅडम,श्रीमती.ढोलपुरे मॅडम तसेच MREGS मधील त्यांचे सर्व सहकारी अधिकारी, कर्मचारी व मित्रमंडळी,तसेच जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथून विशेष उपस्थित. आरेफ खान ( म.राज्य जि.प.अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग ) श्री.ज्ञानेश्वर माऊली, संचालक,जि.प.पतसंस्था संचालक,श्री. सैय्यद साहेब, श्री.ठाकूर साहेब,पदाधिकारी, यांच्यासह अधिकारी,कर्मचारी वृंद उपस्थित होते .



# गिरिजा नदीपात्रात अवैधरित्या वाळू माफियांनी खोदले खड्डे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वडोद बाजार दैनिक पब्लिक राजचे प्रतिनिधी हेमंत वाघ यांच्यावर 06 जानेवारी रोजी महाल किनोळा फरशी फाटा येथे अवैध वाळूचा भरलेला हायवा टिप्पर त्यांच्या गाडीवर मागून धडकून प्राण घेऊन मारण्याचा प्रयत्न व हायवा अंगावर टाकून प्रयत्न तो हायवा ग्रामस्थांनी वडोद बाजार पोलीस स्टेशनला जमा केलेला असून त्या अवैध वाळूच्या भरलेल्या हायवा. त्याचा पंचनामा करून महसूल विभागातर्फे दंड करण्याबाबत वडोद बाजार परिसरामधील भालगाव ,वडोद खुर्दवाडी ,शेवता ,जळगाव मेटे परिसरामधील गिरजा नदीपात्रामध्ये वाळू माफियाने रात्रीच्या वेळी अवैध रीतीने लाखो ब्रास अवैध वाळू चोरी करून एक ते दीड पुरुषाचे खड्डे पाडलेले असून त्याचा पंचनामा करण्याबाबत महोदय वरील विषय तक्रार अर्ज करण्यात येते की फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार परिसरामध्ये गिरजा नदीपात्रामध्ये शासनाचे लाखो रुपयाचे महसूल गोणखणीस वाळू हायवा टिप्पर ट्रॅक्टरच्या साह्याने लाखो ब्रास अवैध रीतीने वाळू उपसा केलेला असून त्याची बातमी दिनांक २७ _१२ _२०२३ रोजी दैनिक पब्लिक राज वृत्तपत्राला छापली होती त्याचा राग धरून वाळू माफिया चे गिरजा नदीपात्रामध्ये धुमाकूळ व महसूल चे विभागाचे नेमलेले पथक वाळूमाफिया च्या दावणीला अशी बातमी छापून आली होती त्याचा राग धरून दैनिक पब्लिक राज प्रतिनिधी हेमंत नारायण वाघ यांनी छापली होती त्याचा राग धरून सनी दिनांक 06/01/2024 रोजी 9: 30 मिनिटाच्या दरम्यान छत्रपती संभाजी नगर ते सिल्लोड महामार्गावर फरशी फाटा महाल किनोळा येथे रात्रीच्या वेळी प्रतिनिधी हेमंत वाघ यांच्यावर व यांच्या गाडीवर भरवेगामध्ये अवैध वाळूचा भरलेला हायवा व टिप्पर त्यांच्या गाडीवर मागून धडकून त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यामध्ये हेमंत वाघ खूप जखमी झालेल्या असून त्यांना उपचाराकरता ग्रामस्थांनी व काही पत्रकारांनी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवले त्यानंतर ते अवैध वाळूचा भरलेला हायवा टिप्पर वडोद बाजार पोलीस स्टेशनला नेऊन सनी जमा केलेला असून त्या हायवा मध्ये महसुली विभागाचे गुण खनिज वाळू अवैध रीतीने वाहतूक व चोरी करत होते त्याचा पंचनामा करून त्यांच्याकडून दंड आकारण्यात यावा व वसूल करण्यात यावा गिरजा नदीपात्रामध्ये हायवा व ट्रॅक्टर यांच्या साह्याने गिरजा नदीपात्रामध्ये अवैध रीतीने वाळू माफिया यांनी एक ते दीड पुरुषाचे खड्डे खोदले असून त्याचा पंचनामा करून मोजमाप करून त्याचे सुद्धा दंड करण्यात यावे ही नम्र विनंती. गिरजा पात्रामध्ये अयोध्या रीतीने वाळू माफिया यांनी दीड पुरुषाचे खड्डे खोदले त्यांचा पंचनामा मोजमाप करावे, असे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन माननीय जिल्हा अधिकारी, विभागीय आयुक्तालय कार्यालय, दंडाधिकारी व तहसीलदार साहेब तहसील कार्यालय फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर असे निवेदन संघर्ष बचाव समितीचे जिल्हा अध्यक्ष गणेश महाले यांनी दिले आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर